


म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : वा.वा
दा. क्र. १०८०

BVBK-0401080

वा.
नों. क्र

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
वा. क्र. ...१०८०
विषय किशोर
५०८

कथा-कौस्तुभ : क्र. १

आंतरराष्ट्रीय बालकवर्षानिमित्त खास मालिका

# मानाचं पान





बाल
वा. क्र. १०८
विषय किशोर
BVBK-0401080


संजय प्रकाशन, पुणे ४

अरविंद हरि देशपांडे

१९७९

" ज्या ज्या स्थळी हे मन जाय माझे
त्या त्या स्थळी ते निजरूप तुझे ।
मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी
तेथे तुझे सद्‌गुरु पाय दोन्ही. ।।"



कु. संजीवनी, कु. संजय कुलकर्णी
आणि
कु. संजीव, कु. राजीव अनगळ
या माझ्या लाडक्यांस–

–अरविंद देशपांडे

**कथानुक्रम**

१) मानाचं पान
२) श्रीमंतांची काटकसर
३) पुत्र व्हावा ऐसा
४) खंडूचा व्यापार
५) अवघे धरू सुपंथ
६) उद्या आपण घर बांधू
७) विजय
८) मुक्या प्राण्यावर दया करा
९) मातृदेवो भव
१०) संतू

एक

# मानाचं पान

रविवार होता. शाळेला आज सुट्टी होती. अगदी सकाळी सकाळी बाहेर हवेत गारठा होता. थंडीनं तर बाहेर पडायची सोयच नव्हती. उबदार रजई अंगाभोवती लपेटून एखाद्या मांजराच्या पिल्लाप्रमाणे सुभाष बिछान्यावर झोपून होता. शाळेची, अभ्यासाची, आज कसली-कसली कटकट नव्हती. म्हणूनच आज स्वारी इतका वेळ झोपून होती.

गोबरे-गोबरे गाल, भुरक्या-भुरक्या केसांचा सुभाष मोठा लोभस दिसायचा. गेल्याच वर्षी अकरावं वर्ष लागलं, तेव्हा सुभाषच्या आईनं त्याच्यासाठी स्वेटर विणला होता आणि तोच त्यानं आज अंगात घातला होता. झोपेत मधूनच तो गालातल्या गालात हसत होता. कोणतं असं सुखस्वप्न तो पाहत होता कोण जाणे ... ?

' अरे सुभाष, साडेसात वाजून गेलेत, आज तुला उठायचं नाही

संजय प्रकाशन : एकशे एक्काहत्तर

© अरविंद हरि देशपांडे

प्रकाशिका :
श्रीमती ललिता शंकर भावे
संजय प्रकाशन,
९१७/२२, फर्ग्युसन कॉलेज रोड,
पुणे ४.

मुखपृष्ठ व प्रसंग चित्रे :
जे. एम्. आर्टस्, पुणे.


मुद्रक :
सौ. आशा प्र. बापट
स्मिता मुद्रणालय,
१२९८, शुक्रवार पेठ,
पुणे ४११ ००२.

प्रथमावृत्ती : १४ जानेवारी १९७९
मकरसंक्रमण, शके १९००

मूल्य पाच रुपये



" ज्या ज्या स्थळी हे मन जाय माझे
त्या त्या स्थळी ते निजरूप तुझे ।
मीं ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी
तेथे तुझे सद्‌गुरु पाय दोन्ही. ॥"



कु. संजीवनी, कु. संजय कुलकर्णी
आणि
कु. संजीव, कु. राजीव अनगळ
या माझ्या लाडक्यांस–

–अरविंद देशपांडे

कथानुक्रम

१) मानाचं पान
२) श्रीमंतांची काटकसर
३) पुत्र व्हावा ऐसा
४) खंडूचा व्यापार
५) अवघे धरू सुपंथ
६) उद्या आपण घर बांधू
७) विजय
८) मुक्या प्राण्यावर दया करा
९) मातृदेवो भव
१०) संतू

एक

## मानाचं पान

रविवार होता. शाळेला आज सुट्टी होती. अगदी सकाळी सकाळी बाहेर हवेत गारठा होता. थंडीनं तर बाहेर पडायची सोयच नव्हती. उबदार रजई अंगाभोवती लपेटून एखाद्या मांजराच्या पिल्लाप्रमाणे सुभाष बिछान्यावर झोपून होता. शाळेची, अभ्यासाची, आज कसली-कसली कटकट नव्हती. म्हणूनच आज स्वारी इतका वेळ झोपून होती.

गोबरे-गोबरे गाल, भुरक्या-भुरक्या केसांचा सुभाष मोठा लोभस दिसायचा. गेल्याच वर्षी अकरावं वर्ष लागलं, तेव्हा सुभाषच्या आईनं त्याच्यासाठी स्वेटर विणला होता आणि तोच त्यानं आज अंगात घातला होता. झोपेत मधूनच तो गालातल्या गालात हसत होता. कोणतं असं सुखस्वप्न तो पाहत होता कोण जाणे ... ?

' अरे सुभाष, साडेसात वाजून गेलेत, आज तुला उठायचं नाही

का ? बघ बरं उन्हं किती वर आलीत ते. का आज शाळेला सुट्टी म्हणून सर्वच गोष्टींना सुट्टी ? चहा झालाय बघ. लवकर ये, थंड होतोय. '

स्वैपाक घरातून त्याची आई म्हणाली, तसा तो खडबडून जागा झाला. हात-पाय ताणून त्यानं जोरात आळस दिला; अन् चटकन अंथरुणावरून उठला. लगेच धावत येऊन आईच्या गळयाला त्यानं मिठी मारली.

' हे बघ, लवकर तोंड धुवून घे, अन् मला एवढी भाजी बाजारातून आणून देतोस ? म्हणजे बाळाला छान-छान खाऊ करून देते ! ' त्याच्या पाठीवरून मायेने हात फिरवीत आई म्हणाली.

बाबांसारखं आज आपणाला बाजारात जायला मिळणार, याचा त्याला मनस्वी आनंद झाला.

' चल, दे बघू पिशवी अन् पैसे, लगेच जातो बघ ! ' म्हणत तो उठला, तेव्हा त्याचे दोन्ही हात गच्च धरीत आई म्हणाली,

' नाही बाबा, तसं नाही करायचं. आधी तुझं तोंड धुणं, चहा, अंघोळ सगळं पटपट उरकायचं अन् मग बाहेर जायचं ! ' तेव्हा थोडासा हिरमुसला होऊन, ' बरं ठीक आहे ! ' म्हणत त्यानं सगळं पटपट आवरलं. झटपट आंघोळ उरकली. त्यानं चांगले कपडे केले. आईनं त्याचा सुरेख भांग पाडला. झटकन त्याने बूट, मोजे घातले. या सर्व कामाला वेळ लावणारा सुभाष आज सारं काही जलद करीत होता.

पायाखाली खुर्ची घेऊन त्यानं खुंटीवरली पिशवी काढली.

' हं, चल दे बघू पैसे, अन् सांग काय काय आणायचंय ते ? '

' हे बघ, हे दोन रुपये घे, चार आण्याची लिंबं, चार आण्याची

कोथिंबीर, चार आण्याच्या मिरच्या, अन् अर्धा किलो वांगी किंवा गोवारी, चांगली एखादी भाजी घेऊन ये. अन् हे बघ, पैसे नीट खिशात सांभाळून ठेव हं. वाटेत कुठेतरी पाडशील!' आईने पुन:पुन्हा बजावले.

'होऽऽ गऽऽ. सर्व काही व्यवस्थित घेऊन येतो. उगीच सारखं-सारखं मला बजावू नकोस बघ. मी काय आता अगदी कुक्कुलं बाळ आहे काय ?' म्हणत सुभाष बाहेर पडला.

बाहेरच्या खोलीत सुभाषचे वडील रविवारचा पेपर वाचत होते आणि त्या दोघांचा संवादही ऐकत होते.

आज बाजारचा दिवस होता. आसपासच्या खेड्यातील लोक हारेच्या हारे भाज्या आणीत होते. हिरव्यागार भाज्यांचे ढीगच्या-ढीग मोठे मोहक दिसत होते. बाजार आता बराच भरला होता. आईने सांगितल्याप्रमाणे सुभाषने सर्व खरेदी केली.

समोरच्या मोठ्या दुकानात लोकांची मोठी गर्दी होती. सुभाषने सहज पाहिलं, त्याच्या ओळखीचं कोणीतरी पाठमोरं तिथे होतं. दुरून ती व्यक्ती अगदी हुबेहूब त्याच्या दामलेगुरुजीं-सारखी दिसत होती. म्हणून त्याने मान उंचावून आणि टाचा वर करून एकवार निरखून पाहिलं.

त्याचा अंदाज अगदी खरा ठरला होता. हो, ते सुभाषच्या शाळेतले दामले गुरुजीच होते. गेल्या वर्षी चौथीत असताना ते त्याला शिकवायला होते. दामले गुरुजींचा गळा फार गोड. भाषेच्या तासाला पुस्तकातल्या कवितांना ते फार सुंदर चाली लावत. वर्गातली मुलं कवितांच्या गोड चालींमुळे, सगळ्या कविता तोंड-पाठ करीत असत. त्यामुळेच दामले गुरुजी त्याला विशेष आवडत.

याच गर्दीत गुरुजींच्या मागे एक अठरा-वीस वर्षांचा तरुण

खिशात हात घालून काही पाहत उभा होता. त्याच्या केसांची झुलपं कपाळावर आली होती. अंगात मळकट, पट्टयापट्टयांचा स्वेटर होता. मानेभोवती त्याने लाल रुमाल बांधला होता. अंगावरली नॅरो पॅंट मळकीच होती, एवढयात दामलेगुरुजी पिशवीत बटाटे घेण्यासाठी खाली वाकले.

डोळयाचं पातं लवतं न लवतं इतक्यात त्या तरुणानं गुरुजींच्या खिशातलं पैशाचं पाकीट लांबवलं, अन् वाऱ्यासारखा तो त्या गर्दीतून पळाला. सुभाषने हे सारं पाहिलं.

'चोऽऽरचोऽऽर! पकडाऽऽ, पकडा त्यालाऽऽ!' जोरात ओरडत तोही त्याच्या मागून धावला. सभोवतालच्या लोकांना काय झालंय हेही कळेना. सुभाषने त्या गर्दीतून त्याचा पाठलाग केला. अखेर सुभाषने चोराला पकडलं. एवढयात लोक जमा झाले. सुभाषने त्याच्या कमरेला घट्ट मिठीच मारली. दोघांची काही वेळ जोरात झटापट झाली, आणि सुभाषने त्या झटापटीत तरुणाच्या खिशातलं पाकीट काढून घेतलं, अन् तो तसाच धावत सुटला.

'गुरुजीऽऽगुरुजीऽऽ! हे घ्या तुमचं पाकीट. त्या चोराने पळविलं होतं.' धापा टाकीत तो बोलला.

'कोण ? सुभाष ? तू माझं पाकीट आणलंस ? सुभाष, राजा, केवढा जीव धोक्यात घातलास रे!' गुरुजींना बोलवेना. त्यांचा कंठ भरून आला. गुरुजींचे डोळे पाण्याने भरले. भोवतालचे सर्व लोक सुभाषकडे आश्चर्याने आणि कौतुकाने पाहत होते.

संध्याकाळी दामले गुरुजींनी शाळेतल्या सर्व मुलांना मैदानावर बोलावलं. आणि गंभीर आवाजात त्यांनी बोलायला सुरुवात केली.

'मुलांनो ! आपल्या शाळेतल्या या छोटचा सुभाषने आज मोठं धाडस केलंय. स्वतःचा जीव धोक्यात घालून त्याने माझं पैशांचं पाकीट आणून दिलं ! केवळ आपल्या या सुभाषमुळेच मला माझे पैसे परत मिळाले बरं का !' गुरुजींचा कंठ भरून आला. ते थांबले.

'मुलांनो, वेलीवर उमललेली नाजूक फुलं जगाला सुवास आणि आनंद देतातच ना ! तसेच तुम्हीही दुसऱ्यासाठी काही ना काही करा. आपण दुसऱ्यासाठी जगण्यातच जीवनाचा खरा आनंद असतो.' दामले गुरुजी प्राजक्ताच्या फुलांचा वर्षाव व्हावा असे बोलत होते. आणि समोरचे ते चिमणे चिमणे जीव जीवाचे कान करून शब्दन्-शब्द ऐकत होते. सर्वांच्या डोळ्यांत पाणी उभं राहिलं.

१५ ऑगस्टला सुभाषला शासनातर्फे मानाने मुंबईला बोलाविण्यात आलं. झेंडावंदनाचा राज्याचा मोठा कार्यक्रम होता.

सेवा आणि धाडस यात अतुलनीय पराक्रम केलेले जिल्ह्या-जिल्ह्यांचे छोटे पाहुणे तिथे आलेले होते. झेंडावंदनासाठी लाखो लोक मैदानावर जमले होते. बॅण्डच्या निनादात 'जन गण मन...' राष्ट्रगीत झालं. पाहुण्यांना मानवंदना आणि संचलन झालं. छोटचा पाहुण्यांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मिठाई आणि मानचिन्हे, सुवर्ण-पदके समारंभपूर्वक देण्यात आली. त्यांचं कौतुक करण्यात आलं.

मुख्यमंत्र्यांनी सुभाषला मिठाईची पेटी दिली. त्याच्या छातीवर मानचिन्ह 'सुवर्ण-पदक' स्वतः लावलं. त्याचं कौतुक केलं. मुख्यमंत्री माईकजवळ उजवा हात उंचावून, मोठ्या आवाजात 'जयहिंद जयहिंद' असं तीन वेळा म्हणाले.

त्याबरोबर लाखो मुखांतून जयहिंद ऽऽची मोठी गर्जना झाली.

त्या आवाजाने आकाश दुमदुमून गेलं.

त्याच वेळी लाऊडस्पीकरवर ध्वनि-मुद्रिका वाजत होती.

हे राष्ट्र देवतांचे,
हे राष्ट्र प्रेषितांचे,
आचंद्रसूर्य नांदो,
स्वातंत्र्य भारताचे ! स्वातंत्र्य भारताचे !!

□

## दोन

# श्रीमंतांची काटकसर

ज्याचं काम त्यानंच करण्यात खरा शहाणपणा असतो. लक्ष्मीधर बायकोच्या सांगण्यावरून मंडईत भाजी आणायला गेला, आणि तिथे त्याची चांगलीच फजिती झाली !

वैभवपूर नावाचं एक गाव होतं. नावाप्रमाणे वैभवपूर वैभवशाली होतं. मोठमोठ्या बागा, लांब-रुंद, मोठे, स्वच्छ रस्ते, रस्त्याच्या दोन्ही बाजूंना उंच उंच सुरूची झाडं, गगनचुंबी, उंच उंच, रंगी-बेरंगी इमारती, इत्यादी गोष्टी वैभवपूरच्या सौंदर्यात भर घालीत होत्या. वैभवपूरचे लोकदेखील सदा सर्वदा आनंदात असत.

त्या गावात लक्ष्मीधर नावाचा एक श्रीमंत गृहस्थ राहत होता. सुलक्षणा नावाची रूपा-गुणानं योग्य अशी त्याची पत्नी होती. आता श्रीमंताचं घर, तिथं खाणं-पिणं, कपडालत्ता, नोकर-चाकर यांना काय कमतरता ? तथापी, लक्ष्मीधर हा फार

हलक्या कानाचा होता. त्याचा कोणावरही विश्वास नसे. प्रत्येका-बद्दल त्याच्या मनात काही ना काही संशय असे.

एकदा त्याची पत्नी सुलक्षणा म्हणाली, 'महाराज, आपले जे खाजगी कारभारी आहेत ना, ते बहुतेक पैसे खात असावेत असं मला सारखं वाटतंय.'

'अग हो, पण ते तू कसं ओळखलंस बुवा?' मोठे आश्चर्य वाटून लक्ष्मीधरने विचारले. 'अहो, परवा मी त्यांना मंडईतून भाजी आणायला सांगितली, तर सांगितली तेवढी ती नसावी. अगदी माझी खात्री आहे. परीक्षा पाहावी म्हणून, 'भेंडी कशी आणलीत म्हणून मी विचारलं हो, तर त्यांना नीट सांगतासुद्धा येईना! अहो, सांगताना त्यांची चांगलीच बोबडी वळली! त्याचवेळी मला त्यांचा दाट संशय आला.'


'अहो, म्हातारपणामुळे नसेल एखादेवेळी लक्षात राहात. परवा तुम्हीसुद्धा अशाच गोंधळून गेला होतात. होतं असं कधी कधी!' लक्ष्मीधर समजावणीच्या स्वरात म्हणाला.

'ते काही सांगू नका. तुमच्या गरीबपणाचा नाही म्हटलं, तरी आपल्या कारभाऱ्यांनी, नोकर-चाकरांनी बराच फायदा घेतला आहे. तुमचं घरात तरी कुठं लक्ष असतं?' सुलक्षणानं त्याची चांगलीच कानउघाडणी केली. 'ठीक आहे! तू तसं म्हणतेस तर उद्यापासून मीच सारे व्यवहार बघेन!' लक्ष्मीधरने लगेच दुसऱ्या दिवशी आपल्या नोकरांना आज्ञा केली,

'जा, पालखी काढा. मला आज मंडईत भाजी आणायला जायचं आहे. वेळ वाया दवडू नका.'

महाराजांचा हुकूम ऐकून नोकर-चाकर चकितच झाले. आश्चर्याने एकमेकांकडे पाहू लागले.

'अरे, आज आपल्या श्रीमंतांनी आरंभलंय तरी काय ? काहीच कळेना !



लक्ष्मीधरच्या आज्ञेप्रमाणे नोकरांनी पालखी उचलली. श्रीमंत पालखीतूनच मंडईत गेले. चाकवत, मेथी, कोथिंबीर, वांगी वगैरे भाज्या त्यांनी खरेदी केल्या. सर्व सामान पालखीत ठेवून पालखी घराकडे नेण्याची लक्ष्मीधराने नोकरांना आज्ञा केली.

वैभवपुरातील सर्व लोकांना आश्चर्य वाटलं. लक्ष्मीधर श्रीमंत स्वतः सामान्य माणसाप्रमाणे भाजीमंडईत कसे काय ? लोकांत एकच चर्चा चालू झाली. लोक एकमेकांकडे स्तंभित होऊन पाहू लागले.

त्याच दिवशी वैभवपूर गावात एक सर्कस आली होती. आणि सकाळी सकाळीच सर्कशीतील उंट, घोडे, हत्ती नेमके त्याच

## तीन

# पुत्र व्हावा ऐसा

सायंकाळची धूसर किरणं पसरली होती. झाडांच्या, माणसांच्या सावल्या दूरवर लांबलचक पसरल्या होत्या. निळ्या आकाशातली सोनेरी तेजस्वी तबकडी आता पश्चिमेकडे कलू लागली होती.

जशी पाखरांनी घरट्याकडं ओढ घ्यावी, तशी माणसं आपल्या घराकडे चालली होती. सारा हमरस्ता मुलं, तरुण, वृद्ध, स्त्रिया, मुली यांनी अगदी गजबजून गेला होता.

शहरातली इतकी माणसं, मोटारी, रिक्षा, टांगे सारखी कुठे जातात बरे...? आणि इतके येतात तरी कोठून? हे काहीच कळत नव्हतं. संध्याकाळची वेळ असल्यानं सारं कसं अगदी गज-बजलेलं होतं.

माणसांच्या घोळक्यातून सुरेशही वाट काढीत चालला होता. त्यालाही घराकडे जाण्याची ओढ होतीच. अक्षरश: पायाला चाकं लावल्याप्रमाणे त्या गर्दीतून आणि आपल्याच विचारात व्यग्र

रस्त्याने नदीला चालले होते. तेव्हा 'पालखीत हिरवं काय दिसतं आहे... ?' हे पाहण्यासाठी उंटाने भाजीत तोंड घातलं. त्याबरोबर लक्ष्मीधरासहित पालखी वरच्यावर अंतराळी उंटाच्या गळ्यातच अडकली. नोकर-चाकर भयभीत झाले. लक्ष्मीधरची तर भीतीने बोबडीच वळली !

शेजार-पाजारच्या लोकांनी मोठ्या कष्टाने त्याला बाहेर काढलं. घरी नेलं. त्याचं सारं अंग ठणकत होतं. एवढ्यात लक्ष्मीधरचा कारभारी आला. तेव्हा लक्ष्मीधर बिछान्यावर विव्हळत होता.

'महाराज, आपण कशाला ही तसदी घेतलीत ? आम्ही आहोत ना असली कामं करायला ! केव्हाही आज्ञा द्या, आम्ही सिद्ध आहोत ना!' नम्रपणे कारभारी म्हणाला,

तेव्हापासून लक्ष्मीधरने अगदी कानाला खडा लावला. ज्याची कामं त्यानेच करावीत. त्यातच खरा शहाणपणा असतो !

□

तीन

## पुत्र व्हावा ऐसा

सायंकाळची धूसर किरणं पसरली होती. झाडांच्या, माणसांच्या सावल्या दूरवर लांबलचक पसरल्या होत्या. निळ्या आकाशातली सोनेरी तेजस्वी तबकडी आता पश्चिमेकडे कलू लागली होती.

जशी पाखरांनी घरट्याकडं ओढ घ्यावी, तशी माणसं आपल्या घराकडे चालली होती. सारा हमरस्ता मुलं, तरुण, वृद्ध, स्त्रिया, मुली यांनी अगदी गजबजून गेला होता.

शहरातली इतकी माणसं, मोटारी, रिक्षा, टांगे सारखी कुठे जातात बरे...? आणि इतके येतात तरी कोठून? हे काहीच कळत नव्हतं. संध्याकाळची वेळ असल्यानं सारं कसं अगदी गज-बजलेलं होतं.

माणसांच्या घोळक्यातून सुरेशही वाट काढीत चालला होता. त्यालाही घराकडे जाण्याची ओढ होतीच. अक्षरशः पायाला चाकं लावल्याप्रमाणे त्या गर्दीतून आणि आपल्याच विचारात व्यग्र

होऊन तो चालला होता. त्यामुळे त्याला भोवतालच्या गर्दीची दखलच नव्हती. एक हात चड्डीच्या खिशात अन् एका हातात कॉलेजच्या विद्यार्थ्यांप्रमाणे शाळेच्या वह्या, पुस्तके सावरीत तो गडबडीनं चालला होता.

घराच्या कोपऱ्यावर असलेल्या पिंपळाच्या झाडावर पक्ष्यांचे थवेच्याथवे चिवचिवाट करीत होते. आणि खरोखरच, ' चिमण्यांची पोरे भारी गोंगाट करिती ' अशी अवस्था होती. त्यांच्याही काही गप्पागोष्टी चालू होत्या.

आज सुरेशलाही आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या, कारण त्यानं शाळेतल्या वक्तृत्व स्पर्धेत पहिला क्रमांक मिळविला होता. ही आनंदाची बातमी घरी आई-वडिलांना केव्हा सांगेन असं अगदी त्याला झालं होतं. बक्षिसाचे मिळालेले पाच रुपये त्यानं खिशातल्या मुठीत घट्ट पकडले होते. त्याचा उर आनंदानं भरून आला होता.

आपण जोरात भाषण कसं केलं, मधेच महत्वाच्या मार्मिक वाक्यांना मुलांनी टाळ्या कशा दिल्या, आपलं तर तिकडे लक्षच नव्हतं. तोंडपाठ केलेल्या भाषणाचा आपला पट्टा चालूच होता. टाळ्यांच्या गजरात भाषण संपवून-जागेवर एखाद्या विजयी वीराप्रमाणे कसं येऊन बसलो आणि त्यावेळी सर्वांच्या नजरा मोठ्या कौतुकानं, आपणाकडे वळून स्तुतिसुमनांचा वर्षाव करीत होत्या. सारे प्रसंग त्याच्या नजरेपुढे तरळत होते. हवेत तरंगणाऱ्या पक्ष्यासारखी त्याच्या मनाची अवस्था झाली होती.

परीक्षक मंडळानं निर्णय जाहीर केला, तेव्हा तर आपला आनंद गगनात मावेना अशी अवस्था झाली होती. आकाश ठेंगणं वाटू लागलं. शाळेच्या मुख्याध्यापकांनी कौतुकानं जेव्हा पाठी-

वरून हात फिरवला, तेव्हा तर आनंदाला पारावारच नव्ह
जणू आपल्या वडिलांचाच हात पाठीवरून फिरत
त्याला क्षणभर वाटलं. गेला आहेस

'सुरेश, तू भाषण छान केलंस हं !' हे ्याली.
कानात सारखे घुमत होते. त्यावेळचा तिच्या अंगात अशक्त-
एखाद्या चित्रपटाप्रमाणे तरळत काहीच न बोलता डॉक्टर

बाहेरच्या अंगणातून राहिले. नंतर थोड्या वेळानं सुरेशला
होतं. घर जवळ णि त्याच्याकडे नजर स्थिर करून ते गंभीरपणे
आनंदातच स, वडील कुठे आहेत ?'
वह्या-पुस्तकं

'आई
'आ



'ते फिरतीवर गेले आहेत, अजून आलेले नाहीत.'
'केव्हा येणार आहेत ?'

‘तसं काही सांगता येणार नाही डॉक्टर.’

– ‘बरं, हे बघ. घाबरू नकोस, पण तुझ्या आईची तब्येत बरी नाही, तेव्हा तिला लगेच हॉस्पिटलमध्ये हलवावं लागेल.’

‘पण डॉक्टर...’

‘सुरेश, काही घाबरू नकोस.’ त्याची पाठ थोपटीत डॉक्टर शांतपणे म्हणाले, ‘मी तिथल्या डॉक्टरना पत्र देतोय, आणि फोन पण करतो. केस लगेच हॉस्पिटलला हलवली पाहिजे. जा, लगेच जा.’

डॉक्टरांचे ते गंभीर शब्द ऐकून, सुरेशला क्षणभर काळच्या-माळच्या करून उभं राहिल्या सारखं वाटलं. परंतु त्यातूनही त्यानं स्वत:ला सावरलं,

‘डॉक्टर, पत्र द्या– मी आजच हॉस्पिटलमध्ये घेऊन जातो.’ सुरेश कसे-बसे म्हणाला,

‘सुरेश, आता काय करायचं रे ?’ घाबऱ्या घाबऱ्या छोटा चंदू म्हणाला.

‘घाबरू नकोस.’ त्यानं डॉक्टरांचं पत्र घेतलं. चंदूनं टांगा आणला. सावकाश उचलून दोघांनी आईला टांग्यात बसविलं.

ते मोठं हॉस्पिटल पाहून सुरेश दडपूनच गेला. पण उसने अवसान आणून त्यानं मोठ्या डॉक्टरांची गाठ घेतली. डॉक्टरनी काळजीपूर्वक तपासलं. अन् चटकन म्हणाले,

‘आम्ही ही केस ॲडमिट करून घेतो. तूर्त औषध देतो, पण ही औषधं सकाळी मिळाली पाहिजेत.’ खाली मान घालून, एका लांबट शुभ्र कागदावर डॉक्टर काही लिहीत होते.

‘उद्या, औषधं मात्र आणा हं !’ औषधाची चिठ्ठी हातात देत पुन्हा एकवार डॉक्टरांनी बजावले.

सुरेशची आई कॉटवर विव्हळत होती. सुरेश–चंदू तिच्या कॉटजवळ बसून ' हे बघ आई, तू घाबरू नकोस. आम्ही पाहतो काय करायचं ते. तू स्वस्थ पडून रहा; ' असे सांगत होते, पण त्यांच्या आईचे डोळे गळायचे थांबेनातच.

' सुरेश, कुठला रे एवढा समजूतदारपणा हा ? अरे, मला इथे आणलंस, पण– पण पैसे कुठे आहेत रे ? सुरेश, अरे मी घरात बिछान्यावर पडून राहिले असते ना. विश्रांती घेतल्यावर बरं वाटलं असतं मला. अगदी हॉस्पिटलमध्ये येण्याचं कारण नव्हतं काही. चल, मी येते घरी. कशाला रे एवढी जिवाची यातायात करतोस ?'

' आई, तू पडून रहा पाहू. आता काही बोलू नकोस. काय व्हायचंय ते होऊ दे, बोलू नकोस अगदी.'

सुरेश व चंदू हॉस्पिटलच्या बाहेर आले. पैशाचा अंदाज घेण्यासाठी त्यांनी ती औषधाची यादी बाहेरच्या कंपौंडरला दाखवली.

' केवढ्याची हो ही औषधं होतील ?'

' कमीतकमी चाळीस रुपये तरी सहज लागतील. कदाचित थोडे जास्तच पैसे लागतील.'

' काय ? चाळीस रुपये ? सुरेश, आता रे ? आपल्याजवळ तरी कोठून एवढे पैसे असणार ?'

काही वेळ दवाखान्याच्या पायरीवर हनुवटीला हात लावून दोघेही बसून राहिले. काय करावं हेच कळेना; पण मार्ग काढणं भाग होतं. सुरेश काही क्षण चंदूकडे पाहतच राहिला. काय मार्ग

'तसं काही सांगता येणार नाही डॉक्टर.'

'बरं, हे बघ. घाबरू नकोस, पण तुझ्या आईची तब्येत बरी नाही, तेव्हा तिला लगेच हॉस्पिटलमध्ये हलवावं लागेल.'

'पण डॉक्टर...'

'सुरेश, काही घाबरू नकोस.' त्याची पाठ थोपटीत डॉक्टर शांतपणे म्हणाले, 'मी तिथल्या डॉक्टरना पत्र देतोय, आणि फोन पण करतो. केस लगेच हॉस्पिटलला हलवली पाहिजे. जा, लगेच जा.'

डॉक्टरांचे ते गंभीर शब्द ऐकून, सुरेशला क्षणभर काळ्याकाळ्या करून उभं राहिल्या सारखं वाटलं. परंतु त्यातूनही त्यानं स्वत:ला सावरलं,

'डॉक्टर, पत्र द्या– मी आजच हॉस्पिटलमध्ये घेऊन जातो.' सुरेश कसे-बसे म्हणाला,

'सुरेश, आता काय करायचं रे ?' घाबऱ्या घाबऱ्या छोटा चंदू म्हणाला.

'घाबरू नकोस.' त्यानं डॉक्टरांचं पत्र घेतलं. चंदूनं टांगा आणला. सावकाश उचलून दोघांनी आईला टांग्यात बसविलं.

ते मोठं हॉस्पिटल पाहून सुरेश दडपूनच गेला. पण उसने अवसान आणून त्यानं मोठ्या डॉक्टरांची गाठ घेतली. डॉक्टरनी काळजीपूर्वक तपासलं. अन् चटकन म्हणाले,

'आम्ही ही केस अॅडमिट करून घेतो. तूर्त औषध देतो, पण ही औषधं सकाळी मिळाली पाहिजेत.' खाली मान घालून, एका लांबट शुभ्र कागदावर डॉक्टर काही लिहीत होते.

'उद्या, औषधं मात्र आणा हं !' औषधाची चिठ्ठी हातात देत पुन्हा एकवार डॉक्टरांनी बजावले.

सुरेशची आई कॉटवर विव्हळत होती. सुरेश–चंदू तिच्या कॉटजवळ बसून 'हे बघ आई, तू घाबरू नकोस. आम्ही पाहतो काय करायचं ते. तू स्वस्थ पडून रहा; ' असे सांगत होते, पण त्यांच्या आईचे डोळे गळायचे थांबेनातच.

'सुरेश, कुठला रे एवढा समजूतदारपणा हा ? अरे, मला इथे आणलंस, पण– पण पैसे कुठे आहेत रे ? सुरेश, अरे मी घरात बिछान्यावर पडून राहिले असते ना. विश्रांती घेतल्यावर बरं वाटलं असतं मला. अगदी हॉस्पिटलमध्ये येण्याचं कारण नव्हतं काही. चल, मी येते घरी. कशाला रे एवढी जिवाची यातायात करतोस ?'

'आई, तू पडून रहा पाहू. आता काही बोलू नकोस. काय व्हायचंय ते होऊ दे, बोलू नकोस अगदी.'

सुरेश व चंदू हॉस्पिटलच्या बाहेर आले. पैशाचा अंदाज घेण्यासाठी त्यांनी ती औषधाची यादी बाहेरच्या कंपौंडरला दाखवली.

'केवढ्याची हो ही औषधं होतील ?'

'कमीतकमी चाळीस रुपये तरी सहज लागतील. कदाचित थोडे जास्तच पैसे लागतील.'

'काय ? चाळीस रुपये ? सुरेश, आता रे ? आपल्याजवळ तरी कोठून एवढे पैसे असणार ?'

काही वेळ दवाखान्याच्या पायरीवर हनुवटीला हात लावून दोघेही बसून राहिले. काय करावं हेच कळेना; पण मार्ग काढणं भाग होतं. सुरेश काही क्षण चंदूकडे पाहतच राहिला. काय मार्ग

काढावा...? अन् एकदम काही तरी आठवल्यासारखं त्याला झालं. त्याला एकदम उमेद आल्यासारखं वाटलं.

'चंदू, माझं तू ऐकतोस ? तू आता घरी जा. नमी घरात एकटी आहे. मी इतक्यातच घरी येतो, आणि हे बघ. घरात भांडत बसू नकोस हं !'

सुरेश शाळेत गेला. त्यानं मुख्याध्यापकांची भेट घेतली. त्यांना सर्व हकीकत त्यानं सांगितली. त्याच्या शिक्षकांना सुरेशबद्दल फार आदर होता. त्यांचं मन गलबलून आलं.

'सर, मला संचयिका बँकेतले आज पन्नास रुपये काढायचे आहेत. मला आज पैशांची फार जरुरी आहे. पैसे काढण्यासाठी मला तुमचं मंजुरीचं पत्र पाहिजे आहे. मग, द्याल नं सर ?' खालच्या आवाजात नम्रपणे सुरेश म्हणाला.

'बरं, ठीक आहे. देतो तुला मी तसं पत्र. आणि उद्या सकाळी पोस्टात जाऊन तू पैसे काढ. मी जाणतो, तुला पैशाची निकड आहे. अरे, अशा प्रसंगासाठीच हे पैसे असतात. आणि हे बघ, तुझ्या आईची तब्येत कशी काय आहे ते मात्र मला अवश्य कळव हं. हे बघ, औषधाचं काम आहे. काही पैसे कमी पडले तरी संकोच करू नकोस. केव्हाही मी तुला देईन.'

'सर, काय हे !' त्याचे डोळे भरून आले. पुढे काय बोलावं हे त्याला सुचेना.

'पाहिलंस ना सुरेश, खाऊला मिळालेले पैसे तू संचयिका बँकेत ठेवलेस, म्हणूनच तुला ते आज ह्या प्रसंगाला उपयोगी पडत आहेत. अरे, थेंबे-थेंबे तळे साचे ! यासाठी बचतीची सवय असावी लागते. मग ती बचत कितीही मोठी अथवा छोटी असो. तेच पन्नास रुपये, आज तुला लाखमोलाचे आहेत की नाहीत ?'

त्याचे मुख्याध्यापक म्हणाले.

सकाळी सुरेशने पैसे आणले. येताना आईची औषधं पण बाजारातून त्यानं आणली. डॉक्टरांचे पैसे दिले.

'सुरेश, तू एवढे पैसे आणलेस तरी कोठून ?' सुरेशच्या आईने कुतूहलाने विचारले.

'आई, आमच्या शाळेत मुलांची संचयिका बँक आहे. खाऊला मिळालेले पैसे मी नेहमी त्यात भरत असतो. अग, असे माझे साठ रुपये साठले आहेत. त्यातलेच आज मी तुझ्या औषधासाठी पन्नास रुपये काढले आहेत. म्हणूनच ही औषधं मला घेता आली, आणि लाखापेक्षा जास्त मोलाची आई मी वाचवू शकलो.'

आणि त्या वेळी माऊलीच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहत होते !

★

म. ग्रं. सं. ठाणें, शाखा.
दा, क्र. ...१०८०
विषय ..किशोर ५८८

चार

## खंडूचा व्यापार

एका गावात खंडू नावाचा एक न्हावी राहत होता. त्याचा घरचा पिढीजात धंदा होता. पण गावाची परिस्थिती आता पूर्णपणे पालटली होती. लोकांत आता पूर्वीसारखा उदारपणा राहिला नव्हता. तरीसुद्धा त्याची आपली बैत्याची चार-पाच बडी घरं अजून जीव धरून राहिली होती.

सुगीच्या दिवसांत खळ्यावर जाऊन तो जोंधळे घेऊन येई. शेंगांची उकरण लागली म्हणजे शेतावर शेंगा गोळा करी. गुऱ्हाळात गेला म्हणजे एखादा मालक गुळाचा खडा देई. छन् छन् पैसा मोजणारं असं गिऱ्हाईक ते त्या खेडेगावात किती असणार ?

वर्षातून एकदा मिळणाऱ्या मिळकतीची चाकरी मात्र त्याला वेळोवेळी बजावावी लागे. लोकांच्या घरी रोज उठून खेटे घालायचे, अन् आंबट चेहरा करून लोकांनी काहीतरी तोंडावर

टाकायचं, असंच रोज होत होतं. याचा खंडूला भारी कंटाळा आला होता. माणसं आता पूर्वीसारखं सढळ हातानं देत नव्हती. पण आपल्या थकलेल्या बापाच्या आग्रहाखातर हे काम खंडूला करावं लागत होतं. त्याला काही इलाजच नव्हता.

खंडूचे दोन्ही भाऊ पुण्या-मुंबईला गिरणीत नोकऱ्या करीत होते. अगदी चैनीत राहत होते. रजा घेऊन ते गावाकडे आले म्हणजे पुण्या-मुंबईच्या अनेक गमती-जमती घरातल्या इतर लोकांना सांगत असत. तेव्हा खंडूला वाटे, खरंच, आपणही मुंबईला जावं. कशाला इथं कुजत पडायचं ? अन् ह्या धंद्यात तरी अशी काय मिळकत होत होती ? या विचारानं त्याचं मन एकदम उचल घेई.

आपल्या इतर भावांप्रमाणं आपणही खूप पैसा मिळवावा, चैनीत राहावं, मनसोक्त हिंडावं-फिरावं असं खंडूला सारखं वाटत असे. पण त्याचा काय उपयोग ? कारण बापाच्या शब्दापुढे त्याला जाता येत नव्हतं. मनातून त्याला त्यांची भीती वाटे.

गावातले एक धनिक शेठ खंडूचं गब्बर कूळ होतं. केस कापायला, दाढी करायला अधूनमधून तो शेठच्या घरी जात असे. शेठही मनानं मोठा होता. खंडूला त्याच्याकडून केवळ बैत्याचं धान्यच नव्हे, तर इतरही बराच फायदा होत होता. ते एक त्याचं मिळकतीचं ठिकाण होतं.

एके दिवशी खंडू शेठची दाढी करीत होता. एका बाजूची दाढी झाली होती अन् दुसऱ्या बाजूला लावलेला साबण तसाच होता– आणि इतक्यातच फोनची घंटा घणघणली.

'खंडू, थांब जरा. फोन काय आहे ते बघतो अगोदर.' शेठ म्हणाले.



'हां ऽऽ हां ऽऽऽ ! कोण...? कोण... ? मी शेठ बोलतोय. हां ऽऽ हां ऽऽ ,बोला...! काय ? बोट बंदरात आली ? बोट आली कां... ? बरं मग ? अच्छा... अच्छा चार हजाराला घेऊन टाका आणि बोट घेतल्यावर फोन करा. हे पहा, यात नाही जमलं, तर तुमच्या मतानं दहा हजारापर्यंतचं ठरवाच पण नक्की द्या ! अच्छा...ओ. के...!'

शेठचे फोनवर असे नेहमी संभाषण होत असे. दाढी करायला अथवा केस कापायला खंडू शेठच्या घरी येई, तेव्हा नेहमी असे

दहा हजार, पंधरा हजार, शेठचे संभाषण खंडूच्या कानावर पडत असे. खंडूला या सर्व गोष्टींचं नवल वाटे. शेठ इथं राहून सर्व व्यवहार करतो कसा ?

एकदा खंडूनं दाढी करताना मोठ्या खुबीनं विचारलं, 'मालक एक इचारू का ?'

'हो हो, विचार. काय पाहिजे ?'

'शेठ, ह्ये तुमचं फोन कुठून येत्यात ?'

'अरे, हा व्यापार आहे. मुंबईला मी बोट खरेदी करतो. त्याचे हे फोन असतात.'

'असं व्हय, मग– मग मालक ह्ये व्यापाराचं शास्त्र मला जमंल का ?' खंडू संकोचानं म्हणाला.

'वेडा कुठला !' मोठ्याने हसत शेठ म्हणाला. 'साबण लाव अगोदर.

'अरे, हा व्यापार आहे. याला भांडवल किती लागतं ? छे छे ! हे तुला काय जमणार ?'

खंडूच्या डोक्यात सारखे तेच विचार घोळत होते. व्यापारात खूप फायदा होईल आणि थोड्या काळातच आपण आपल्या इतर भावांपेक्षा जास्त पैसा मिळवू. ते काही नाही, शेठकडून व्यापार करायचाच ! त्यानं मनाचा निश्चय केला. चार दिवसांनी खंडू शेठकडे पुन्हा आला. दाढी करता करता त्यानं पुन्हा विषयाला हात घातलाच.

'शेठ, काहीही करा, पण-पण माझ्या नावावर एक बोट खरेदी कराच. माझ्याजवळ साठवलेले चार हजार रुपये आहेत. ते मी तुम्हाला देतो, पण माझ्या नावावर एक बोट घ्याच. आता नाही म्हणू नका.'

शेठ पुन:पुन्हा काकुळतीला येऊन म्हणाला, ' अरे खंडू, तू वेडा का आहेस ? अरे, कशाला उगाच सुखाचा जीव दु:खाच्या खाईत टाकतोस ? काही बिघडलं तर मला मात्र दोष देशील. नको, तू काही यात पडू नकोस !'

तरीही खंडू काही केल्या ऐकेच ना. शेठचा अगदी नाइलाज झाला. याच वेळी मुंबईहून एक बोट बंदरात आल्याचा शेठला फोन आला. तेव्हा लगेच खंडू म्हणाला, ' शेठ, काही नाही, ही बोट माझ्या नावावर घ्याच.' आणि लगेच शेठने तीच बोट चार हजाराला खरेदी केली.

आता आपणाला खूप फायदा होणार याचा खंडूला फार आनंद झाला. बोट बंदराला लागताच उघडण्यात आली. आणि काय आश्चर्य ? संपूर्ण बोट मेथीच्या भाजीनं भरलेली होती !

आता, ह्या इतक्या भाजीचं काय करायचं ? आणि इतकी भाजी घेणार तरी कोण ? सारीच अडचण निर्माण झाली होती.

खंडू डोकं आपटून धाय मोकलून रडत होता. ' शेठ, हे काय झालं हो ?'

' तरी तुला मी सांगत होतो, की तू काही यात पडू नकोस.'

' शेठ, काहीही करा, पण ह्या गरिबाला वाचवा.' रडत रडत खंडूने शेठचे पाय धरले. ' मालक, गरिबाला एक वेळ क्षमा करा. पुन्हा चुकूनसुद्धा ह्या धंद्यात पडणार नाही.' हुंदके देत खंडू बोलत होता.

अखेर शेठला पण खंडूची दया आली. काहीही करून ह्या गरिबाला संकटातून वाचवले पाहिजे असे शेठला वाटू लागले. त्याने ताबडतोब आपल्या तिजोरीतून चार हजार रुपये काढून खंडूला दिले. आता कुठे खंडूचा जीव भांड्यात पडला. खंडूलाही

चांगली अद्दल घडली होती. शेठने पर्वताएवढा वाळलेल्या मेथीच्या भाजीचा ढीग कोठ्यात भरून ठेवला. त्याची जरासुद्धा लोकांपुढे वाच्यता केली नाही. असेच दिवस निघून गेले.

पुढे काही दिवसांनी अरबस्तानात घोड्यांना, उंटांना पायाच्या रोगाची साथ उद्भवली. या साथीच्या रोगामुळं कितीतरी घोडे, उंट मृत्युमुखी पडले होते. तेव्हा रोगाच्या ठिकाणी पायाला मेथीची भाजी लावली तर रोग लगेच बरा होतो, असा लोकांना तपास लागला. पण ती वेळ अशी होती, की त्या वेळी मेथीची भाजी काही केल्या कुठं म्हणून कुठं मिळेनाशी झाली. लोक सारखे शोधाशोध करीत फिरत होते.

आणि याच वेळी शेठने आपल्या कोठ्यातली ती पूर्वीच खरेदी केलेली मेथीची भाजी दहा रुपये तोळ्याने विकून हजारो रुपये कमाविले !

★

## पाच

# अवघे धरू सुपंथ

त्या छोटयाशा खोलीत सूर्याचा प्रकाश भरून राहिला होता. यंत्राची कामं जशी एकापाठोपाठ चालू व्हावीत, तशी त्या घरातली सारी कामं चालू झाली होती. खोलीतल्या व्यक्तींची हालचाल बाहेरच्या व्हरांडयातूनदेखील स्पष्ट दिसत होती. पण एकमेकांकडे लक्ष द्यायला वेळ होताच कुठे ? कारण कोंबडीच्या खुराडयासारखी दाट वस्ती असलेल्या त्या चाळीतल्या प्रत्येकाला पोटापाण्याच्या उद्योगाला जाणे भाग होते. तशीच त्या खोलीतल्या दोन जीवांची धडपड चालू होती.

‘मंजू, अग मंजू, तुला आज शाळेला जायचं नाही का ? अग, साडेदहा होऊन गेलेत हं. जा आता तू, मी करेन सगळी झाकापाक. अग, तुझी शाळा लांब आहे म्हणून म्हणतो.’

‘हो, पण काका. अजून थोडा अवधी आहे. झालंय माझं सारं.’

दोन लांबसडक वेण्या पाठीवर टाकत अन् परकराचा ओचा खोचत, गोबऱ्या गोबऱ्या गालांची, मण्यासारख्या डोळ्यांची, काळ्याभोर कुरळ्या केसांची मंजिरी फरशी पुसता पुसता मागे वळून म्हणाली. तिच्या मागे वळून पाहणाऱ्या डोळ्यांकडे काका टक लावून बराच वेळ पाहत होते.

अगदी हिच्या वळणावर गेलीय हं ! आपला हेका काही कधी सोडायची नाही. अगदी हेच टपोरे डोळे. असंच अगदी आखूड नाक. अस्साच स्वभाव.

काकांना आपल्या दिवंगत पत्नीची आठवण येऊन डोळे भरून आले त्यांचे. पण त्यांनी ते अश्रू कसेतरी लपवले.



मंजिरीचे आपल्याकडे लक्ष नाही असे पाहून एक-दोनदा शर्टाच्या हातोप्यांनी त्यांनी आपले डोळे पुसलेसुद्धा. पण मंजिरीच्या चाणाक्ष नजरेतून ते काही सुटले नाही. तशी ती चटकन पुढे येऊन आणि त्यांचे दोन्ही हात पकडून म्हणाली,

‘ काका, हे काय ? असं नाही करायचं हं. मी घरात नसले म्हणजे एकटेच डोळे गाळीत बसता. काका, मग सांगा बघू मी शाळेत जाऊ का नको ते ?’ त्याबरोबर त्यांनी स्वत:ला सावरीत म्हटलं, ‘ छे छे ग, तसं नव्हे. पण– पण मंजू, तुझं बोलणं ऐकल्यावर जणू तीच कानात कुजबुजते आहे असं सारखं वाटतं. म्हणून की नाही, असं होतं कधी कधी. हे बघ, पण तू आता थांबू नकोस. तू आपली जा कशी शाळेला.’

‘ काका, तुमचा युनिफॉर्म मी काल धुऊन ठेवला आहे. आज कामावर जाताना तोच घाला बरं का. आणि बरं का काका, संध्याकाळी रिक्षा शाळेकडूनच आणा. म्हणजे मी पण तुमच्या बरोबर येईन.

अन् रात्री फार वेळ गाडी चालवू नका हं. संध्याकाळीच शेठला रिक्षा परत देऊन टाका.

काका, दिवसभर अशी ओढाताण करता, अन् मग रात्री ठसकत बसता. आणि हो विसरलेच की. तुमचं औषध पण कपाटात ठेवलंय हं. आठवणीनं घ्या हं. खोकल्यावर तेवढाच आराम वाटेल. घ्याल नं काका औषध ? माझ्या गळ्याची अगदी शप्पथ आहे हं, न घ्याल तर !’ आपला उजवा हात गळ्यावर नेस मंजिरी काकुळतीला येऊन म्हणाली. तसे तिचे काका कावरेबावरे होऊन आणि आवेगाने तिचे दोन्ही हात पकडून म्हणाले,

'हो हो, घेईन हं बाळ.

मंजू, किती ग माझी काळजी करशील ? अग, होईल माझं कसं तरी.'

आपलं झटपट आवरून, दप्तर घेऊन मंजिरी बाहेर पडली. आणि तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे भरल्या डोळ्यांनी काका किती तरी वेळ पाहत होते. पत्नी गेल्यापासून त्यांचं मन कशातच रमत नव्हतं. तास न् तास स्वतःशीच विचार करीत बसत. मग खाण्यापिण्याची कशा-कशाची त्यांना आठवण होत नसे.

अशा या चिमुकल्या घरट्यामधली एका छोट्या पिलाची आई न संपणाऱ्या प्रवासाला निघून गेली होती आणि पिलाचे वडील मायेच्या घरट्यात संगोपन करीत होतें. 'मंजिरी किती गुणी मुलगी आहे ! खरंच, अशी ही गुणी हिरे-माणिके तो परमेश्वर आमच्यासारख्या दरिद्री लोकांच्या पदरात का बांधतो बरं ? काय ह्या हिऱ्याला मी कोंदणात ठेवणार ?'

काकांनी पितळी बटनाचा खाकी कोट अंगात घातला. दाराला कुलूप लावून ते बाहेर पडले. मंजिरीचे ते हळवे शब्द काकांची पाठ सोडत नव्हते.

भराभरा पाय उचलून, मंजिरीने शाळा जवळ केली. आज तिला नेहमीपेक्षा बराच उशीर झाला होता. शाळेच्या आवारात अगदी शांतता नांदत होती. सर्व मुलंमुली वर्गात गेली होती. प्रार्थना आणि हजेरी होऊन पहिला तासदेखील चालू झाला होता. सगळीकडे कसं शांत शांत वाटत होतं. शाळेचा शिपाई बाहेरच्या व्हरांड्यात एका छोट्या स्टुलावर घंटेशेजारी बसून होता.

'मे आय कम इन, सर ?' मंजिरी हातातली पुस्तके सावरीत

दबकत म्हणाली. क्षणभर वर्गाच्या नजरा मंजिरीकडे वळल्या. तिला ओशाळल्यासारखंच झालं. संकोचाने ती दारात उभी होती.

'ओ येस, कम इन !' पुस्तकातून नजर वळवून जोशी सर म्हणाले. तशी मंजिरी पहिल्याच बाकाकडे वळली. आधीच्याच बाकावरल्या दोघीजणी कुरबुर करीत थोडंसं सरकून घेत तक्रारीच्या सुरात, म्हणाल्य'तुझं हे असं. नेहमीच बाई मंजे लवकर यायला काय होतं बाई ?'

सुमित्रा शहा त्रासिकपणे म्हणाली, 'उशिरा यायचं ते यायचं! अन् पहिल्या बाकावर जागा मिळवायची, बरं बाई तुला हे सगळं साधलंय ! हुं ऽ ऽ,बसा आता बाईसाहेब !' बाजूला सरकून घेत अन् डोळे मोठे करीत खालच्या आवाजात वसुमती म्हणाली.

'सुमे, किती वेळ झाला ग ?' मंजिरी.

'हुं ! पुस्तक आणलं नसेल बाईसाहेब तुम्ही ! बघा आता आमच्याच पुस्तकात.' वसुमती पुस्तक तिच्याकडे सरकवीत म्हणाली.

'मंजे, तुझं बाई नेहमीच असं असतं.' सुमतीनंही त्यात सूर ओढलाच. आणि ती आपल्या पेन्सिलीला टोक करण्याच्या नेहमीच्या उद्योगाला लागली.

'मुलांनो,

आईचं प्रेम निरपेक्ष असतं. ती कुठेही असली अन् कशीही असली, तरी आपल्या चिमुकल्यांसाठी तिचा जीव पुनःपुन्हा ओढत असतो. असं तिचं प्रेम असतं. हातांचा पाळणा आणि नेत्रांचा दिवा ती सतत करीत असते.' जोशी सर गंभीरपणे बोलत

चष्म्यातून साऱ्या वर्गाकडे नजर टाकीत होते. वर्गात टाचणी पडली तरी आवाज यावा इतकी शांतता होती. नेहमी वर्गात गडबड करणारी मुलंसुद्धा अगदी शांत होती.

वर्गातले ते चाळीस-पन्नास जीव जिवाचा कान करून सरांच्या तोंडचा शब्द न् शब्द ऐकत होते. ' बा नीज गडे, नीज गडे लडिवाळा, नीज नीज माझ्या बाळा...' जोशी सरांचा मंजूळ आवाज वर्गात भरून राहिला. ' रवि गेला रे सोडुनि आकाशाला

धन जैसे दुर्भाग्याला... सगळ्या नातलगांनी ते फार गरीब म्हणून त्यांची संगतसोबत सोडली होती. दरिद्री माणसांची कोण संगत करणार ? म्हणून कवी पुढे म्हणतात,

' खडबड हे उंदिर करिती,
कण शोधायाते फिरती
परि अंती निराश होती
लवकरि हे ही, सोडतील सदनाला
गणगोत जसे आपणाला...
बाऽऽनीज गडेऽऽ, नीज गडे लडिवाळा...'

इतक्यात शाळेचा शिपाई नोटीस घेऊन वर्गात आला. जोशी सरांनी पुस्तक बाजूला केलं. ' सोमवार दि. २४ रोजी शाळेची सहल महाबळेश्वरला जाणार आहे. ज्या मुला-मुलींना सहलीला जायचे असेल, त्यांनी रु. १५- श्री. चाफळकर सर यांच्याकडे भरावेत. उशिरा नावे दिलेल्या विद्यार्थ्यांचा विचार केला जाणार नाही. तेव्हा नावे सत्वर नोंदवावीत.' सरांनी नोटीस वाचून तीवर सही केली.

' अशी ती गरीब माता आपल्या तान्हुल्याला म्हणते, ' जग काहीही म्हणो, परंतु, जोवरी या कुडीत राहील प्राण तोवरी

तुज संगोपीन. हे माझ्या बाळा, मी तुझी कोण काळजी करणार ? परमेश्वरच मग तुझी काळजी करेल ! तोच तुझे संगोपन करेल !'

'ठाणऽऽठाणऽऽठाण...!' एवढ्यात तास संपल्याची बेल झाली. मराठीचा तास अगदी रंगला होता. घंटा देणाऱ्या त्या शिपायाचा मंजिरीला भारी राग आला. 'आणि काही वेळ तास असाच चालू राहिला असता तर...?' साऱ्या वर्गाला असंच वाटत होतं. जोशी सर वर्गाबाहेर पडले, तसे पक्ष्यांचा किलबिलाट व्हावा तसा वर्गात मोठमोठ्यानं कलकलाट चालू झाला.

'काय ग सुमे, जाणार का तू ट्रिपला ?' वेणीचा शेपटा पुढे ओढीत सुमित्रा म्हणाली.

'बघणार बाई घरात आई-बाबा काय म्हणतात ते. आम्ही कुठाय बाई तुमच्यासारखे श्रीमंत ?'

'मी तर बाई ट्रिपला जाणार. अग, परवा माझ्या वडिलांनी वाढदिवसासाठी मला वीस रुपये दिले आहेत. आजच शाळा सुटल्यावर चाफळकर सरांकडे मी पैसे भरणार आहे.' मान वेळावीत, तोऱ्याने सुमी म्हणाली.

'अग, पण घरची परवानगी ?'

'तसं नव्हे गं... वडिलच म्हणालेत, तू त्या पैशांचं काहीही कर ! म्हणून म्हणते. आणि तू ग उर्मिले ?'

'अग, तिचे वडील कलेक्टर आहेत. तिला काय एवढं पैशाचं ग ?' मध्येच सुशीला जरा जोरात म्हणाली– तशी उर्मिला चाफेकळी नाकाचा शेंडा उडवीत बोलली, 'होयच मुळी, आमचे पप्पा कलेक्टर आहेतच मुळी ! सुशे, अग, मी ट्रिपला जाणार आहे ! हे नुसतं त्यांना कळलं, तरी लगेच शिपायाबरोबर शाळेत पैसे पाठवतील.

आहेतच मुळी आमचे पप्पा तसे !' डाव्या हाताच्या तळव्यावर उजवा हात जोरात आपटीत उर्मिला म्हणाली. 'सुशीच्या वडिलांसारखे कचेरीतले कारकून नाहीत काही ते !' हेही ती सांगायला विसरली नाही.

तिच्या या लागट बोलण्यानं सुशीलाच्या नाकाला मिरची झोंबली. तिचे डोळे भरून आले. 'हे काय ग उर्मिले तुझं बोलणं ते, अगदी तुकडा पडल्यासारखं ! सुशीला, असं लागट बोलायचं होय ?'

'हे बघ उषे, तू मध्ये बोलू नकोस. मग तिनं मला तसं का म्हणावं ? म्हणून मी पण बोलले.'

'बरं बरं, उर्मिले, ते जाऊ दे ग ! पण मंजे, तू येणार ना आमच्याबरोबर ट्रिपला ? हे काय...? तू तर काहीच बोलत नाहीस.'

'अग, ती कशी बोलेल ? मघाची जोशी सरांची 'ती' कविता अजून तिच्या डोक्यात घोळत असेल ! म्हणून तर बाईसाहेब गप्प आहेत म्हटलं !' सुमित्रा शहा ठसक्यानं म्हणाली.

'हे काय ग सुमित्रे ? सरांनी किती जीव तोडून कविता शिकवली, अन् तू असं बोलतेस ?

'होय मंजे, सरांनी कविता जीव तोडून शिकवली, हे सगळं खरं ग, पण म्हणून का इतकं मनाला लावून घ्यायचं ? चल, मूर्ख कुठली ! अग, आपण जे ऐकलं ना, ते सारं विसरायचं असतं. बरं, पण ते जाऊ दे. पण तू आता ट्रिपला येणार का ?' सुमित्रा समजाविण्याच्या स्वरात म्हणाली.

'हे पाहा सुमित्रा, तुम्ही जा सर्वजणी ट्रिपला. मी नाही येत.'

मंजिरी शांतपणे म्हणाली.

'असं काय ग मंजे ? आमच्यावर रागावलीस ? जाऊ दे ग. एवढं काय मनावर घ्यायचं ? तुझ्याखेरीज आम्हाला ट्रिपला जायला नको वाटतं बघ.'

'पण—पण नको ग ! तुम्ही जा नं ! अग, मी काही तुमच्या-वर रागावणार नाही काही.'

'तुला पैशाची काळजी वाटते काय ? हे बघ, तू पैशाची नको काळजी करूस. अग, आपल्या शाळेच्या संचयिकेत माझे पैसे आहेत. त्यातून मी देते तुला पंधरा रुपये. पण तू जर आमच्या-बरोबर नसशील तर आम्हाला सुनं सुनं वाटेल ग. तू ये बाई !

अग, माझे आई-वडील, घरात येणारे नातलग, जे पैसे मला खाऊसाठी देतात ना, ते मी सगळे संचयिकेत ठेवते. अग, थेंबे थेंबे तळे साचे ! असेच ते वेळेला उपयोगी पडतात ग.

पाहिलंस मंजिरी, ह्या संचयिकेतील पैशानं मला तर ट्रिपला जाता आलं, पण तुलाही जाता आलं. मग सांग, आहे की नाही फायदेशीर ?'

'सुमे, खरंच मंजीला पैसे दे.' उषा म्हणाली.

'अग, आपण सर्वजणी ट्रिपला गेलो तर खूपच मजा येईल. नाही का ग मंजिरी ? पण, बरं का ग उर्मिले, आपण आता भांडायचं नाही हं. अग, आपण एकत्र येतो ते भांडण्यासाठीच का ? आपल्या बरोबरच्या मैत्रिणीला मदत नको का करायला ?' तेव्हा सर्वजणी, 'खरं, आहे तुझं उषा. आता आपलं भांडण बंद. मग तर झालं ?' तेव्हा हास्याचा एकच धबधबा सर्वत्र उसळला !

★

सहा

## उद्या आपण घर बांधू

एक होतं जंगल. त्या जंगलात वाघ, सिंह, हत्ती, अस्वल, जिराफ असे खूप खूप प्राणी होते. आता जंगल म्हटल्यावर तिथे झाडांना काय तोटा असणार? घनदाट लतावेलींबरोबर तेथे मोठेमोठे वृक्षही होते.

अशा ह्या जंगलात एक जुनं, मोठं, विस्तीर्ण वडाचं झाड होतं. त्या वडाच्या झाडावर बऱ्याच दिवसांपासून एक मोठा माकडांचा कळप राहत होता. दिवसभर जंगलातून इकडे-तिकडे भटकावे, अगदीच कंटाळा आला तर वडाच्या झाडाची लाल लाल, छोटी छोटी फळे खावीत आणि अंधार पडू लागला म्हणजे वस्तीला सर्वांनी त्या वडाच्या झाडावर एकत्र जमावे– असा त्यांचा नेहमी उद्योग चालू असे.

रात्रंदिवस झाडावर होणाऱ्या त्यांच्या 'चीऽऽचीऽऽचीऽऽ' आवाजाची जंगलातल्या सर्वच प्राण्यांना सवय झाली होती.

एकदा काय झालं, सोसाटयाचा वारा सुटला. धुळीचे लोट उंच उंच आकाशात उडाले. वादळानं जंगलातली काही झाडं उन्मळून पडली. त्या प्रचंड आवाजानं माकडांची छोटी पिले घाबरून गेली. 'आई ऽऽ, आई ऽऽ, माझ्या डोळयात काहीतरी गेलंय ग, जरा फुंकर घालतेस का?' त्यांतलं एक पिल्लू आईला बिलगत म्हणालं.

तेव्हा त्या माऊलीनं आपल्या हातानं पापण्या बाजूला करत डोळयात एक फुंकर मारली आणि आपल्या छबडयाचा एक पापा घेत म्हटलं 'हे बघ राजा, आता कुठे जाऊ नकोस हं. जोराचं वारं सुटलंय. आकाश पण भरून आलं आहे. कदाचित थोडया वेळात आता मुसळधार पावसालासुद्धा सुरुवात होईल. आणि म्हणून म्हणते राजा, कुठे जाऊ नकोस. अन् काळजीनं उगाच माझा जीव टांगू नकोस बाबा!'

आता आकाशात काळया ढगांची गर्दी झाली होती. वाऱ्याचा जोर वाढतच होता. आकाशात विजा चमकत होत्या. मेघांचा गडगडाट चालू होता. पावसाचे मोठे मोठे टपोरे थेंब पडू लागले तसे जंगलातले प्राणी सैरावैरा धावत सुटले. मेघगर्जनेबरोबर वाघ, सिंह डरकाळया देत सुसाट पळू लागले, गुहा जवळ करू लागले. पशु-पक्षी आपल्या घरटयाकडे धावले. हवेतला गारठा आता वाढतच होता.

त्या जंगलातल्या वडाच्या झाडावर 'आई, मला फार थंडी वाजतेय ग.' पिलू आईला बिलगत म्हणाले.

'थांब हं राजा, घाबरू नकोस. अरे, थांबेल एवढयात पाऊस. असाच बसून राहा.' पाठीवरून हात फिरवीत पिलाची आई म्हणाली. पण आता तर पावसानं अगदी जोर धरला होता. विजा

जोरात कडाडत होत्या. मुसळधार पाऊस पडत होता. झाडावर माकडांचा कळप पावसानं भिजून चिंब झाला. त्यांच्या डोक्यां-वरून आणि लांबलचक शेपट्यांतून पाणी ठिबकत होतं. लहान लहान पिले आपल्या आयांना बिलगून बसली होती आणि गार वाऱ्यानं ती सर्वच काकडत होती.

'आई, कधी ग हा पाऊस थांबायचा ? मला तर भारी थंडी वाजते आहे.' कुरकूर करीत पिल्लू आईला म्हणालं.

'होय रे राजा, थांबेल हं आता पाऊस.'

'हो ग, ते सारं खरं. थांबेल पाऊस. पण मला फार थंडी वाजते त्याची काय वाट ग ? पाहिलंस ना आई, जंगलातले सगळे प्राणी आपल्या आपल्या घरांत कसे निवान्त झोपले आहेत ! तो बघ तो वाघ कसा गुहेत शिरला आहे. बघ, सिंह कसा गुहेत धावला. अग, ती बघ ती चिऊ कशी आपल्या पिलाबरोबर घरट्यात झोपली आहे.'

'आई, आपल्याला का ग असं एखादं घरटं नाहीये ?' पिलानं झोंबतच आईजवळ तक्रार मांडली.

'हे बघ राजा, अंधार किती झाला आहे ! आपण आजची रात्र अशीच काढू आणि उद्या सकाळी इतर प्राण्यांसारखं माझ्या राजासाठी छोटसं घर बांधू हं– काय ? आता तरी राग गेला नं ?' त्याचा एक गालगुच्चा घेत म्हणाली. तिचं ते बोलणं झाडावरल्या सर्व माकडांना पटलं, तेव्हा ते एकमुखाने म्हणाले, 'तू म्हणतेस ते खरं आहे. जंगलातल्या इतर प्राण्यांना, पक्ष्यांना जशी त्यांची घरं आहेत, तसं आपणही आपल्यासाठी घर बांधू. हो, हो ! आपणही बांधू, माकडांत आनंदाची एकच लाट पसरली. थंडीनं काकडत त्यांनी तशीच रात्र काढली.

एकदा काय झालं, सोसाटयाचा वारा सुटला. धुळीचे लोट उंच उंच आकाशात उडाले. वादळानं जंगलातली काही झाडं उन्मळून पडली. त्या प्रचंड आवाजानं माकडांची छोटी पिले घाबरून गेली. 'आईऽऽ, आईऽऽ, माझ्या डोळयात काहीतरी गेलंय ग, जरा फुंकर घालतेस का?' त्यांतलं एक पिल्लू आईला बिलगत म्हणालं.

तेव्हा त्या माऊलीनं आपल्या हातानं पापण्या बाजूला करत डोळयात एक फुंकर मारली आणि आपल्या छबडयाचा एक पापा घेत म्हटलं 'हे बघ राजा, आता कुठे जाऊ नकोस हं. जोराचं वारं सुटलंय. आकाश पण भरून आलं आहे. कदाचित थोडया वेळात आता मुसळधार पावसालासुद्धा सुरुवात होईल. आणि म्हणून म्हणते राजा, कुठे जाऊ नकोस. अन् काळजीनं उगाच माझा जीव टांगू नकोस बाबा!'

आता आकाशात काळया ढगांची गर्दी झाली होती. वाऱ्याचा जोर वाढतच होता. आकाशात विजा चमकत होत्या. मेघांचा गडगडाट चालू होता. पावसाचे मोठे मोठे टपोरे थेंब पडू लागले तसे जंगलातले प्राणी सैरावैरा धावत सुटले. मेघगर्जनेबरोबर वाघ, सिंह डरकाळया देत सुसाट पळू लागले, गुहा जवळ करू लागले. पशु-पक्षी आपल्या घरटयाकडे धावले. हवेतला गारठा आता वाढतच होता.

त्या जंगलातल्या वडाच्या झाडावर 'आई, मला फार थंडी वाजतेय ग.' पिलू आईला बिलगत म्हणाले.

'थांब हं राजा, घाबरू नकोस. अरे, थांबेल एवढयात पाऊस. असाच बसून राहा.' पाठीवरून हात फिरवीत पिलाची आई म्हणाली. पण आता तर पावसानं अगदी जोर धरला होता. विजा

जोरात कडाडत होत्या. मुसळधार पाऊस पडत होता. झाडावर माकडांचा कळप पावसानं भिजून चिंब झाला. त्यांच्या डोक्यां-वरून आणि लांबलचक शेपटयांतून पाणी ठिबकत होतं. लहान लहान पिले आपल्या आयांना बिलगून बसली होती आणि गार वाऱ्यानं ती सर्वच काकडत होती.

'आई, कधी ग हा पाऊस थांबायचा ? मला तर भारी थंडी वाजते आहे.' कुरकूर करीत पिल्लू आईला म्हणालं.

'होय रे राजा, थांबेल हं आता पाऊस.'

'हो ग, ते सारं खरं. थांबेल पाऊस. पण मला फार थंडी वाजते त्याची काय वाट ग ? पाहिलंस ना आई, जंगलातले सगळे प्राणी आपल्या आपल्या घरांत कसे निवान्त झोपले आहेत ! तो बघ तो वाघ कसा गुहेत शिरला आहे. बघ, सिंह कसा गुहेत धावला. अग, ती बघ ती चिऊ कशी आपल्या पिलाबरोबर घरटचात झोपली आहे.'

'आई, आपल्याला का ग असं एखादं घरटं नाहीये ?' पिलानं झोंबतच आईजवळ तक्रार मांडली.

'हे बघ राजा, अंधार किती झाला आहे ! आपण आजची रात्र अशीच काढू आणि उद्या सकाळी इतर प्राण्यांसारखं माझ्या राजासाठी छोटसं घर बांधू हं– काय ? आता तरी राग गेला नं ?' त्याचा एक गालगुच्चा घेत म्हणाली. तिचं ते बोलणं झाडावरल्या सर्व माकडांना पटलं, तेव्हा ते एकमुखाने म्हणाले, 'तू म्हणतेस ते खरं आहे. जंगलातल्या इतर प्राण्यांना, पक्ष्यांना जशी त्यांची घरं आहेत, तसं आपणही आपल्यासाठी घर बांधू. हो, हो ! आपणही बांधू, माकडांत आनंदाची एकच लाट पसरली. थंडीनं काकडत त्यांनी तशीच रात्र काढली.

सकाळ झाली. सूर्याची सोनेरी किरणं चौफेर पसरली. पशु-पक्षी मंजूळ आवाजात गात होते. वडाच्या झाडावरली माकडं सूर्याच्या उबदार किरणांनी अगदी ताजीतवानी झाली होती. जंगलातल्या झाडांवर इकडून-तिकडे आता ती उड्या मारीत होती. पुन्हा दिवसभर त्यांचा दैनंदिन कार्यक्रम चालू झाला. असेच चार दिवस लोटले.

सायंकाळी आकाश मेघांनी भरून आले. मुसळधार पावसाला सुरुवात झाली. जंगलातले सगळे प्राणी, पशु-पक्षी, आपापल्या घरांकडे परतले.

त्या वळवाच्या पावसात वडाच्या झाडावरली सगळी माकडं ओलीचिंब झाली.

'आई, मला फार थंडी वाजतेय ग.' पिलू आपल्या आईला बिलगत म्हणाले.

'हे बघ राजा, उद्या सकाळी, इतर पशु-पक्ष्यांप्रमाणे आपणही एक छोटंसं घर बांधू हं. बघ, अंधार कसा पडलाय. हे बघ, आजची रात्र तेवढी कशीबशी काढ.'

बिचाऱ्या पिलाने आईला काहीच उत्तर दिले नाही. ते तसेच बिलगून राहिले.

पहाट झाली. वडाच्या झाडावरली माकडं वेगवेगळ्या दिशेला पांगली. या झाडावरून त्या झाडावर ती उड्याच मारीत राहिली...!

★

## सात

### विजय

---

'अन् हे काय संजू ? अग, अशी पुस्तकं भिरकावून, धावत धावत स्वयंपाकघरात तशीच कशी आलीस ? अग, बाहेरून आल्यावर पाय स्वच्छ धुऊन मगच आत यावं. संजू, बाहेरच्या पायानं देवाजवळ किंवा स्वयंपाकाजवळ जाऊ नये ग !'

'हो ऽऽ हो ऽऽ, बरं आजीबाई ! मामे ऽऽ, पुरे झाली तुझी शिस्त. मी आलेय शाळेतून दमून. भुकेनं जीव कसा व्याकुळ झाला आहे माझा– अन् त्यात तू मला शिस्तीचे धडे दे. हे बघ, जेवण झाल्यावर ठेवीन पुस्तकं जिथल्या तिथं.' दोन्ही गाल फुगवून रागारागाने संजू आपल्या मामीला म्हणाली.

'संजू, ते काही नाही. तू आधी बाहेरच्या नळावर स्वच्छ पाय धुऊन ये बघू. मग तुला मी लगेच वाढते. मला नाही बाई असं अमंगळ आवडत.' तिची मामी निश्चयाने म्हणाली.

'बरं ऽऽ बरं ! मग तरी वाढाल नं बाईसाहेब ?' मान उडवीत

आणि दोन्ही वेण्या मागे टाकीत, पाय आपटतच संजू बाथरूमकडे वळली. 'बघा बाईसाहेब! आहेत ना पाय स्वच्छ धुतलेले? का पुन्हा धुऊन यायला पाहिजेत?'

'जा, बैस खुर्चीवर. वाढते मी आता.' तिच्या मामीनं जेवणाचं ताट डायनिंग टेबलावर ठेवलं. संजूला भूक लागली होती. पण मामीपुढे तिचा नाइलाज झाला होता.

'मामे, वांग्याची भाजी खरंच छान केली आहेस ग!' संजू मोकळेपणाने म्हणाली. 'थांब हं, वाढते आणि थोडी. आता सावकाश जेव. एकेक 'गोष्ट' शिकून घे. अग, मुलीच्या जातीला सगळं काही आलं पाहिजे. नुसतंच शिक्षण असून चालत नाही. प्रत्येक गोष्टीची माहिती करून घ्यावी लागते. 'मला सारं काही आलं पाहिजे!' ही जिद्द मुलींकडे असावी लागते संजू, तरच सगळं काही येतं. स्वयंपाकाकडे कधीच फिरकायचं नाही म्हटल्यावर कसं काय सगळं जमणार?'

'सुरू झालं का हे मामी तुझं? मला बघ– हे तुझे विचार अजिबात आवडत नाहीत. मामी, खरंच तू किती मागासलेल्या विचारांची आहेस ग! अगदी काकूबाई शोभतेस बघ. माझ्या वर्गात डिसूझा नावाची माझी एक मैत्रीण आहे. तिच्या घरी मी एकदा गेले होते, तर पायात बूट घालून तिचे दोन भाऊ, बहीण, वडील डायनिंग टेबलावर जेवण करीत होते. अग मामे, तिच्या आईनं तर 'क्रॉप' केला आहे. अन् पायात उंच टाचेचे बूट, पांढरा शुभ्र झगा घालून अग ती त्यांना वाढीत होती.

अग, किती मॉडर्न फॅमिली आहे त्यांची म्हणून सांगू! अन् तू मला पाय न धुता आले तर इतकं बोलून घेतलंस! नवे नवे शोध लागत आहेत, मानव चंद्रावर जातोय, किती नव्या नव्या

फॅशन्स येत आहेत. माणसाचं Standard of living किती वाढत आहे ! अन् तू आपल्या जुन्या गोष्टी उराशी बाळगून बसली आहेस ! मामी, उगाच नाही मी तुला मागासलेली म्हणत काही ! तू अगदी वेगळ्या दुनियेत वावरतेस बघ !

अग, आजकाल मीठ, पापड, सांडग्यापासून अगदी पुरणपोळी-पर्यंत सगळं काही दुकानांतून मिळतं म्हटलं बाईसाहेब ! करता नाही आलं तरी काही अडून राहत नाही. तुझं ते नऊवारी पातळ, मानेवरला मोठा अंबाडा हे पाहिलं म्हणजे बाई ऽ बाई ऽऽ माझं डोकं उठतं बघ ! अग, बाहेरच्या जगाकडं बघशील की नाही ? अन् मला लागलीय शिस्तीचे धडे द्यायला ! बरं का मामीसाहेब, नाही, म्हटलं अगोदर आपण सुधारा अन् मग दुसऱ्यांना शिस्त लावा !' संजू निर्भीडपणे बोलत होती.

संजू माझी भाची. नुकतंच तिला बारावं वर्ष संपून तेरावं लागलं आहे. तिची आई, म्हणजे माझी बहीण, परगावी नोकरी निमित्त बाहेर असल्यानं तिनं तिला माझ्याकडे शिक्षणासाठी ठेवलं होतं. संजूला चांगली शिस्त लागावी, तिच्यावर घरातले चांगले संस्कार व्हावेत अशी तिची इच्छा. संजू आणि तिची मामी यांची मैत्री पण चांगली जुळली होती. मैत्रीतले रुसवे-फुगवे जे असतात ते त्यांच्यातही होते.

मी बाहेर आरामखुर्चीत वर्तमानपत्र वाचत होतो. वाचत होतो कुठला म्हणा, वाचण्याचा बहाणा करीत होतो. स्वयंपाकघरात संजूचा अन् तिच्या मामीचा चाललेला संवाद माझ्या कानावर येत होता. त्यांच्या त्या सुखसंवादात माझी मात्र चांगली करमणूक होत होती.

'बरं बरं संजू, पुरे झालं तुझं सुधारणेचं पुराण ! असू दे बरं

मी काकूबाई दिसत असेन तर !' 'हि'च्या नाकाला मिरची झोंबली. पण मी मात्र मनातून सुखावलो होतो. कारण संजू तिला माझ्या मनातलंच सांगत होती. बरं झालं परस्पर कानउघाडणी झाली ते !

'मामी, खरंच का ग तू माझ्यावर रागावलीस ? नको बाई अशी रागावूस.' जवळ येऊन मामीचे दोन्ही हात हातांत घेत संजू थोडया नरमाईच्या स्वरात म्हणाली. त्याबरोबर निराशेचे काळे ढग कुठल्या कुठे लुप्त झाले. अन् क्षणार्धातच हास्याचा, आनंदाचा झरा खळखळ वाहू लागला. असा ऊन-पावसाचा खेळ नेहमीच चालतो.

'मामी, माझं तुझ्याकडे एक काम आहे– अन् ते तू केलं पाहिजेस हं.'

'हो, पण ते सांग तरी ! अग, मग पाहू ते !' मामी.

'अग, आमच्या शाळेत पाठांतर स्पर्धा आहेत. ज्ञानेश्वरीतला बारावा अध्याय तोंडपाठ करायचा आहे. मी त्या स्पर्धेत नाव दिलं आहे. मग, तू माझी तयारी करवून घेशील ना ? हेच काम आहे !'

'हो ! मी जरूर तुझ्याकडून तयारी करवून घेईन. पण– पण...'

'अग, पण पण काय ?'

'पण मी सांगेन तसं तुला वागावं लागेल. काय, आहे कबूल ?'

'बरं बाई, आहे कबूल ! मग आज सुरुवात करायची ना ?'

'हो ! जरूर !' संध्याकाळी संजूच्या मामीनं देवापुढे दिवा लावला, तुळशीपुढे निरांजन ओवाळून ठेवलं. छोटया मदन अन्

अमृतनं हात जोडून देवापुढे 'शुभं करोति' म्हटलं. दोघे हाताने जेवून झोपी गेले होते.

'मामी, हे बघऽऽ... बारावा अध्याय, माझ्या मैत्रिणीकडून आणलाय मी. चल सांग बघू मला म्हणायला...' घाईघाईने संजू म्हणाली.

'अंहंऽऽ! तसं नाही हं! तू प्रथम हात-पाय धू, कपडे बदल अन् मग देवापुढे हात जोडून उभं राहायचं. तरच मी तुला सांगणार!'

'झाली का तुझी शिस्त चालू?' संजू किंचित रागाने म्हणाली.

'ते काही नाही. तू मला माझ्या मनाप्रमाणे वागण्याचं वचन दिलं आहेस!'

'अग, आमच्या त्या डिसूझाच्या घरात...'

'अंहंऽऽ, ते काही नको मला सांगू. मी सांगेन तसं ऐकलं पाहिजे!'

'बरं बाई, ऐकते! मग तरी झालं मनासारखं?'

आज संजू अगदी आनंदात उड्या मारीतच आली. मामीला कधी पाहिलं होतं का नव्हतं, असं तिला अगदी झालं होतं. कधी एकदा मामीला भेटेन असं तिला झालं होतं. घरात आल्यावर गळ्यातलं पाटी-दप्तरदेखील काढून ठेवण्याचं तिला भान राहिलं नव्हतं.

अंगणातूनच 'अग मामीऽऽ, अग मामी,' अशा मोठ्यानं हाका मारीतच ती धावत घरात आली आणि समोर मामी दिसताच, तिने आपले दोन्ही चिमकुले हात मामीच्या गळ्यात घालून तिला मिठीच मारली!

'अग हो, पण बाईसाहेबांना एवढा आनंद तरी कशाचा झाला आहे ?' तेव्हा आपल्या हाताच्या छोटया पंज्यांनी तिचे तोंड आपल्याकडे वळवीत म्हणाली,

'अग, तू माझा बारावा अध्याय पाठ करून घेतला होतास ना, अगदी तसाच स्पष्ट, सावकाश मी म्हटला, आणि त्यात माझा पहिला नंबर आला ! उद्या आमच्या शाळेत बक्षीस समारंभ आहे. अध्यक्षांच्या हस्ते मला तीस रुपयांचे बक्षीस मिळणार आहे. मग, बक्षीस समारंभाला तू आमच्या शाळेत उद्या येणार ना...?' मामीचे डोळे पाणावले. तिनं तशीच संजूला प्रेमानं छातीशी धरलं. 'होऽऽ होऽऽ! येईन हं !'

'बघ हंऽनक्की येऽऽ! मामी, मी तुझी वाट बघेन बघ.' नक्की ये!' दुसऱ्या दिवशी शाळेत जातानाही तिनं आपल्या मामीला पुन:पुन्हा बजावलं होतं. संजूच्या शाळेत आज बक्षीस समारंभ होता. शहरातले विविध थरांतले लोक आले होते. सारे सभागृह भरले होते. स्वागतगीत झाले. स्पर्धेत यशस्वी झालेल्या मुला-मुलींनी आपले अध्याय म्हणून दाखविले. आपला पाठांतराचा अध्याय म्हणताना संजू भिरभिरत्या नजरेनं आपली मामी कुठे बसली आहे याचा शोध घेत होती. मामीला पाहताच तिचा जीव भांड्यात पडला. अध्यक्षांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले. संजूने मामीकडे हसत हसत पाहत स्टेजवर बक्षीस घेतलं.

अध्यक्ष माईकपुढे बोलायला उभे राहिले.

'मुलांनो !

तुमच्या शाळेतल्या पहिल्या क्रमांक मिळविलेल्या संजीवनीने चांगले पाठांतर केलेले आहे. समजून केलेल्या पाठांतराने मनावर चांगले संस्कार होतात. 'ज्ञानेश्वरी, हा एक उत्कृष्ट स्फूर्तिग्रंथ

आहे.

घरातल्या पालकांनी मुलांवर चांगले संस्कार केले, चांगले आदर्श डोळ्यांपुढे ठेवले तर ती आपले भावी जीवन सुखी करू शकतील असा मला विश्वास वाटतो. माती ओली आहे, तोपर्यंतच त्याची सुंदर मूर्ती बनविता येते. ही मुले आपल्या जीवनात निश्चित चमकतील, कारण त्यांच्या पालकांनी उत्तम संस्कार केलेले आहेत.

हेच सुसंस्कार माणसाला चांगल्या गोष्टींकडे ओढत असतात. या पालकांना मी धन्यवाद देतो.'

अध्यक्षांच्या प्रत्येक वाक्या गणित संजूच्या मामीचा ऊर आनंदानं भरून येत होता, अंगावर मूठभर मांस आल्यासारखं वाटत होतं. कारण तो तिचाच ' विजय ' होता !

★

## आठ

# मुक्या प्राण्यावर दया करा

दयानंदाला आठवे वर्ष संपून नववे लागले होते. चौथीतून तो पाचवीत गेला होता. मराठी शाळेतून तो आता नवीन शाळेत— हायस्कूलमध्ये जाणार होता. सारेच नवे वातावरण होते.

एकदा दयानंदाची आई त्याच्या वडिलांना म्हणाली, ‘आपला दया आता मोठा दिसतो नाही ? मला वाटतं, या वर्षी त्याला मुंज लाभत असली तर करून घ्यावी. छान दिसेल मुंजा नाही ?’

‘हो तर ! तू म्हणतेस ते काही खोटं नाही. पाहू या तरी आपण गुरुजींना विचारून मुलाला गुरुबळ आहे की नाही ते. मी आजच संध्याकाळी सगळी चौकशी करून येतो. मग ठरवू काय ते. हो, पण तुझी तयारी सगळी आहे ना ? म्हणजे पुन्हा तुझी काहीही तक्रार नको !’

संध्याकाळी दयानंदाचे वडील मोठ्या खुषीतच घरी आले. गुरुजींकडून दयानंदाच्या मुंजीचा मुहूर्तच त्यांनी काढून आणला

होता. चहा घेता घेता त्यांनी ही बातमी दयानंदाच्या आईला सांगितली. 'हा मुहूर्त अगदी उत्तम आहे. आणि विशेष म्हणजे या वर्षी गुरुबळ चांगले आहे. तेव्हा ह्याच मुहूर्ताला कार्य उरकून घेऊ या.' दयानंदाचे वडील म्हणाले.

घरात आता कार्याची गडबड उडाली होती. दयानंदाच्या वडिलांनी शुभमुहूर्ताने सर्व नातलगांना पत्रे घातली. कार्याला थोडेच दिवस राहिल्याने गडबड उडाली. दयाच्या आईने वाड्यातल्या बायकांच्या मदतीनें पापड, सांडगे, कुरवड्या, निवडणं-पाखडणं, सारी बारीक-सारीक कामं केली. घरातलं हे पहिलंच कार्य असल्यानं तिचा आनंद गगनात मावेना. दयानंदासाठी जरीची टोपी खरेदी केली. नवे कपडे शिवायला टाकले. एक सोन्याची चेन आणि अंगठी सोनाराकडे करायला टाकली होती.

अशी एकूण दयानंदाची चंगळच होती. दयाच्या छोट्या बहिणीला नवा जरीचा परकर-पोलका शिवायला टाकला होता. या कामी दयाच्या आईची तर तारांबळच उडत होती. तिला तहान-भुकेचेसुद्धा भान राहत नव्हते. घर आता हळूहळू पाहुण्यांनी भरू लागले.

'दया, आता आम्ही रात्री तुझी मांडी कापणार! एक मोठी बेडकी त्यात घालणार!' दयाचा आत्येभाऊ त्याला चिडवे. 'आई, बघ की ग रमेश कसा मला सारखा चिडवतो ते!' म्हणत तो घाबरून आईकडे जाई.

'रमेश, आता एका माणसाच्या तबल्याचा आवाज छान येईल नाही?' त्याचा दुसरा मामेभाऊ म्हणाला. अशा वेळी दयाची मात्र त्रेधातिरपिट उडे. काय उत्तर द्यावे हेच त्याला सुचत नसे. काही जमेनासे झाले म्हणजे तो आईकडे तक्रार नेत असे. चेष्टेतून

तो मुळूमुळू रडायला लागे कधी. की मग सगळ्यांची चांगली करमणूक व्हायची.

'दया, आता रडून नाही चालायचं. रोज आंघोळ झाल्यावर सकाळी आणि संध्याकाळी संध्या केली पाहिजे. रोज सूर्य-नमस्कार घातले पाहिजेत !' त्याचे थोरले काका खलबत्त्यात पान कुटत म्हणाले दया सर्वांचे बोलणे ऐकून घेई, पण कुणालाही उलट उत्तर देत नसे.

मुंजीमध्ये दयानंदाला लोकांनी अनेक वस्तू दिल्या. त्याच्या आत्याने सुंदर रेशमी शर्ट, टेरिकॉटची पँट, जरीची टोपी आणली होती. त्या पोषाखात स्वारी अगदी सुरेख दिसत होती. त्या वेळी दयाच्या आत्याने त्याची दृष्टसुद्धा काढली. सर्व कार्य दयाच्या आईच्या मनाजोगं झालं होतं. घर पाहुण्यांनी भरलं होतं. दयाच्या बरोबरची मुलं घरात जमली होती. त्यामुळे दंगा, धुडगूस याला ऊत आला होता. खेळायला घरचे अंगण अपुरे पडत होते. मुलांनी घर अगदी डोक्यावर घेतलं होतं. पण मोठी माणसं आप-आपल्या कामांत गुंतली होती. मग कुणी कुणाला बोलायचे ? त्यामुळे मुलं अगदी खुषीत होती. बरोबरीच्या भावंडांत दयाचे दिवस कसे जात होते हे कळत नव्हतं. खेळापुढे त्याला काही सुचत नव्हतं. अगदी जवळ असूनसुद्धा आईनं किंवा वडिलांनी दहा-दहा हाका मारल्या तरी त्याला ऐकू येत नसे.

मुंजीचा सोहळा आटोपला होता. काही पाहुणे मंडळी आता आपल्या घरी निघाली होती. घरात मोकळं मोकळं वाटत होतं. पाहुणे मंडळींनी घर कसं भरल्यासारखं वाटत होतं. पण आता सुनं सुनं वाटू लागलं होतं.

दयानंदाचे वडील संध्याकाळी ऑफिसमधून घरी आले होते.

चहा घेऊन आरामखुर्चीत ते पेपर वाचत होते. दयानंदाची आई शेजारच्या मैत्रिणींसह रामाला गेली होती. बाहेर मुलांचा खेळ रंगला होता. दयानंदही त्या खेळात सामील झाला होता.

एवढ्यात त्याला रस्त्याच्या कडेला एक गोंडस कुत्र्याचं पिल्लू दिसलं. पण त्याचं सारं अंग घाणीनं माखलं होतं. कुई कुई करीत ते रस्त्याच्या कडेनं चाललं होतं. त्यातच गल्लीतली टवाळ पोरं त्याला खडे मारीत होती. किंचाळत, ओरडत ते रस्ता दिसेल तिकडे धावत होतं. त्याची ती केविलवाणी अवस्था पाहून दयानंदाला फार वाईट वाटलं. त्याला ते पिल्लू मनापासून आवडलं होतं. 'आपण जर हे पिल्लू पाळलं तर किती मजा येईल !' असा विचार त्याच्या मनात आला. मुलांच्या घोळक्यापासून ते पिल्लू दूर आल्यावर दयानंद एकटाच त्याच्यामागून गेला. हळूहळू त्याला पकडण्याचा दयानंद विचार करू लागला. याला पकडून आपल्या घरी न्यावं. मग आपल्याला खूप खेळायला मिळेल. त्याच्याशी आपली मैत्री जुळेल. मग खूप खूप मजा येईल. मनाशी तो विचार करीत होता. आणि हळूच त्याने त्या पिल्लाला पकडले.

त्या छोट्याशा पिल्लाने बिलकूल कुरकूर केली नाही. त्याला एक चांगला मित्र मिळाला होता. थंडीने कुडकुडत असलेल्या त्या छोट्या पिल्लाला दयानंदाने मोठ्या प्रेमाने आपल्या शर्टाच्या ओच्यात गुंडाळून घेतले होते. या छोट्याला आता मी स्वच्छ करेन, मग दूध अन् भाकरी घालेन. रोज थोडा थोडा याच्याशी खेळेन. या उत्साहाच्या भरातच तो घरी आला.

ओसरीच्या पायऱ्या चढत असतानाच त्याच्या वडिलांचे लक्ष शर्टाच्या ओच्याकडे गेले. 'काय रे दया, ओच्यातून काय आणलं

आहेस ? अरे, किती वेळ बाहेर खेळायचं ?' दयानंदाचे वडील मोठ्या आवाजात म्हणाले. तसा त्यांच्याजवळ येत 'बाबा, हा पाहिलात का माझा नवा मित्र ? डोळे कसे पहा अगदी काचेच्या मण्यासारखे आहेत. आणि कपाळावर बघा कसा काळा गोड ठिपका आहे, कुणाची दृष्ट लागू नये म्हणून !' मनमोकळे-पणाने दयानंद म्हणाला.

'अरे, हे काय कार्ट्या, कुत्र्याचं पिल्लू ? शर्टाच्या ओच्यातून आणलंस ? परवाच मुंजीत नवा शर्ट केलाय ना ? कशाला हे आणलंस ? नवा शर्ट इतका घाण केलास ?' संतापून रागाच्या भरात त्याच्या वडिलांनी दोन मुस्कटात लगावल्या अन् पाठीत एक जोराचा दणका घातला.

दयानंदाचा जीव कळवळला. त्याबरोबर ओच्यातलं पिल्लू खाली जमिनीवर पडलं. त्याच्याही पाठीत त्यांनी लाथ मारली. त्याबरोबर ते कोपऱ्यात जाऊन पडलं. कुई कुई करून विव्हळू लागलं.

दयानंदाचे गाल लाल झाले. बाबांच्या हातची बोटं त्याच्या गालांवर उठली होती. दयानंदाला रडतासुद्धा येईना. त्याला हुंदके आवरेनात. भेदरून गेलेल्या त्या चिमुकल्या पिल्लाने करुण नजरेने एकवार दयानंदाकडे आणि त्याच्या वडिलांकडे पाहिले. कुई कुई आवाज करीत, विव्हळत ते दरवाज्यातून बाहेर पडले. दयानंदाच्या डोळ्यांची धार थांबेना. चिमुकल्या हातांनी तो पुनःपुन्हा डोळे पुसत होता. रडण्याचा आवाज येण्याची तर सोयच नव्हती.

'जा आत, बदल ते कपडे. सारखं दिवसभर खेळायला पाहिजे. आता बाहेर जायचं नाही. जा, अभ्यास करीत बैस.' वडील जोरात दरडावले. तसा दयानंद आत आला. त्याने हात-पाय धुतले. कपडे

बदलले. पाटी-दप्तर घेऊन तो अभ्यासाला बसला. 'धडा पहिला— मुक्या प्राण्यावर प्रेम करा.

'मुलांनो, मुके प्राणी हेच आपले मित्र आहेत...' धडा वाचताना त्याचे डोळे भरून येत होते. 'तुम्ही त्यांना प्रेम लावा. हे प्राणीसुद्धा माणसांवर प्रेम करतात...'

दयानंद हुंदके देत देत एक एक शब्द मोठ्याने वाचत होता. बाहेर दयानंदाचे वडील वर्तमानपत्र वाचता वाचता डोळ्यांच्या ओलावलेल्या कडा धोतराच्या सोग्याने टिपत होते !

★

नऊ

## मातृदेवो भव

आकाशातला सोन्याचा तेजस्वी गोळा डोंगराआड लपत होता. अंधुक धूसर होत जाणाऱ्या झाडांच्या सावल्या जमिनीवरून लांब लांब रांगत होत्या. पृथ्वीवर हळूहळू प्रकाशाचं साम्राज्य जाऊन अंधाराचं राज्य पसरू लागलं होतं. रस्त्याकडेच्या हिरव्यागार झाडीतून रातकिडयांची चाहूल लागत होती. आता आकाशात एखाद-दुसरी चांदणी लुकलुकत होती.

दूरवरचे उसाच्या मळयातील उंचउंच तुरे वाऱ्यावर डुलत होते. त्या दूरवरच्या मळयाच्या पलीकडे एक बुटकं कौलारू घर झाडीतून मान वर करीत होतं. अनंताचे पाय घराच्या ओढीनं धावत होते. त्याच्या खिशातल्या बक्षीस मिळालेल्या पाच रुपयांचा आनंद तर त्याच्या मनात मावत नव्हता! ह्या पाच रुपयांत सारं जग जणू विकत घ्यायचा विचार चालला होता

स्वारीचा !

बालमन किती विचित्र असतं नाही ? व्यवहाराची अन् त्याची कधी संगत जमत नाही. पाण्यात जसे तरंग उठावेत तसे मिळालेल्या बक्षिसातून काय काय खरेदी करावयाचे याचे वादळ अनंताच्या मनात अगदी थैमान घालीत होते. हवेतून चालल्यासारखं वाटत होतं त्याला. घराजवळ तो केव्हा आला हे त्याचं त्यालादेखील कळलं नाही. हातातलं दप्तर त्यानं कोनाड्यात टाकलं अन् तसाच स्वैंपाकघरात येऊन

'आई, हे बघ, मला शाळेच्या स्पर्धेत पाच रुपये बक्षीस मिळालेत. अग, माझा पहिला नंबर आलाय,' असे म्हणत अनंता आईला बिलगला. तिचे डोळे भरून आले. आणि खळकन गरम दोन थेंब अनंताच्या मनगटावर पडले. अंगावर मूठभर मांस आल्यासारखं वाटलं त्याला ! क्षणभर त्याला स्वर्गसुखच वाटलं. जगात मातृप्रेम म्हणतात ते हेच काय ? याचा सुखद अनुभव त्यानं त्या दिवशी घेतला. प्रेम होतं ते !

अनंताच्या पाठची दोन छोटी भावंडं एकमेकांच्या गळ्यांत हात टाकून एका दुपट्यावर समाधानानं झोपली होती. मधून-मधून ती गालांत हसत होती. आपण श्रीमंत झाल्याची सुखद स्वप्नं त्यांना पडत होती की काय ? शेजारच्या खोलीत जिवाला कंटाळलेले त्याचे बाबा दम्याने एकसारखे कण्हत होते.

अनंताला पाहताच तिचं मन प्रफुल्लित झालं. आनंदातिशयानं तिनं त्याला छातीशी घेतलं. 'शहाणा माझा बाळ' म्हणत तिनं पाठीवरून हात फिरविला. केवढं हलकं हलकं वाटलं अनंताला !

त्याचे वडील फार जिद्दीचे. १९४२ च्या क्रांतीत त्यांना

शिक्षा झाली होती. महात्मा गांधींच्या तत्वज्ञानानं ते पुरेपूर भारले होते. 'भारतमातेची मुक्तता' याखेरीज काहीही सुचत नव्हतं. त्या वेळी देशभक्तांची देशात सारखी धरपकड चालू होती. अनेकांना कारावास पत्करावा लागला, हाल-अपेष्टा सोसाव्या लागल्या. अखेर देश स्वतंत्र झाला. त्या वेळी शिक्षा झालेल्या क्रांतिकारकांच्या मुलांना आता सरकारने शैक्षणिक सवलती आणि पेन्शनीही चालू केल्या होत्या. अनंतानं आपल्या वडिलांना हे सुचवलं. तेव्हा बिछान्यावरून सरसावून म्हणाले कसे, 'बेटा, जे केलं ते देशप्रेमानं केलं ! आता ह्या हलाखीच्या परिस्थितीत त्यांच्याकडे सवलती अन् पेन्शन मागायला जाऊ होय ?' असे म्हणत बाबा हाल-अपेष्टा भोगीत होते.

त्यांचे कृश हात उजवीकडून डावीकडे सारखे हलत होते. आणि त्यात भरीत भर म्हणजे जिवाला आधार असलेली जमीनही कुळकायद्यानं गेली होती. उतारवयात बाबांचा सारा आधार सुटला अन् जीव खाणाऱ्या दम्यानं त्यांना घेरलं होतं.

'आई, काल डॉक्टरनी दिलेलं औषध बाबांनी घेतलं का ग ?' अधीरतेने अनंताने विचारलं.

'होय, घेतलं की. पण अजून ढास काही थांबली नाही रे. शिवाय आजही काही औषधं लिहून दिलेली आहेत. माझ्या-जवळचे तर सगळे पैसे संपलेत. घरात तर एकही जोंधळ्याचा दाणा नाहीय.' डबडबलेल्या डोळ्यांनी त्याची आई बोलत होती.

'थांब आई, कुठाय ती डॉक्टरांची चिठ्ठी ? आत्ता घेऊन येतो औषधं दुकानातून. अन् येताना जोंधळेही आणतो.' अनंता मोठ्या रुबाबात म्हणाला.

'अरे, पण एवढे पैसे कुठायत ?'

'का ? हे बघ नं !' खिशातली पाच रुपयांची नोट तिला दाखवीत अनंता म्हणाला.

'पण अनंता, तुझ्या बक्षिसाचे पैसे घरात कशाला उगाच खर्च ? राहू दे ना तुला ते. घे तू काहीही त्याचं मनासारखं. जा राजा, तुझ्या बक्षिसाचे पैसे घरात घेताना माझ्या मनाला कसंसंच वाटतं बघ !' आई आर्त स्वरात म्हणाली.

'आई, बाबांच्यापेक्षा का मला हे पैसे जास्त आहेत ? घेऊन येतो मी सगळं.' पिशवी घेऊन तो बाहेर पडलादेखील ! बाबाचं दोन दिवसांचं औषध अन् जोंधळे त्यानं घेतले.

आतल्या खोलीत आई, बाबांना औषध देऊन त्यांचं अंथरूण पांघरूण नीटनेटकं करीत होती.

'रावसाहेब पुरंदऱ्यांच्या वाड्यात ह्या खेपेला दिवाळीला बरेच पाहुणे यायचे आहेत म्हणे ! परवा वाड्यातल्या देवीला गेले होते, तेव्हा पुरंदरेकाकूंची गाठ पडली होती. ह्या खेपेला त्यांच्या जावयाला दिवाळसण आहे म्हणे !

म्हणत होत्या, 'याल का आठ दिवस स्वैंपाकाला ?'

मी म्हटलं, 'कळवीन नंतर.' त्यांच्याकडे चार दिवस स्वैंपाकाला जावं म्हणते. तेवढीच मदत होईल.' आई भरल्या कंठानं बोलत होती.

'पार्वती, एवढं मोठं घराणं असूनही तुझ्यावर ही पाळी यावी नं ? त्यापेक्षा वाटतं–'

अनंताची चाहूल लागल्यानं त्यांचं बोलणं मध्येच थांबलं. आत येऊन त्यानं औषध दिलं. बक्षीस मिळाल्याचं त्यानं त्यांना सांगितलं तेव्हा त्यांना केवढा आनंद झाला !

'छान, छान!' ओढल्या गेलेल्या आवाजातही बाबा मोठ्याने म्हणाले,

'पार्वती, पाहिलंस? अनाथांच्या गाई भगवान राखतो म्हणतात ते काही खोटं नाही हं.'

स्वैंपाकघरात आई भाकरी करीत होती. मिणमिणत्या चिमणी-शेजारी गुडघ्यांभोवती हात बांधून अनंता बसला होता.

'भूक लागली का रे?'

'नाही ग. माझं सकाळी फार खाणं झालंय ना!'

'मला खोटं सांगतोयस होय गुलामा? थांब, तुला वाढते हं.' तिनं पानात आमटी-भाकरी वाढली. त्या साध्या जेवणाला जणू अमृताची गोडी लाभली होती. एवढ्यात दारावर आवाज झाला.

'कोण आहे?' पानावरूनच अनंतानं विचारलं.

'मी– बापूसाहेब.' घरमालक.

अनंता अर्धेमुर्धे जेवण टाकून तसाच उठला.

'या, बापूसाहेब, या. बसा.' त्यांना बसायला घोंगडं टाकीत हसतमुखाने अनंता म्हणाला.

'हे पाहा, मी बसायला आलो नाही. पाच महिने झाले, पण भाड्याचे पैसे देण्याचं नाव नाही. आजवर तुमचं फार ऐकलं. आता यापुढे तुमचं काही ऐकून घ्यायला आम्हाला सवड नाही!' बापूसाहेब तावातावाने बोलत होते.

'बापूसाहेब, इतके दिवस थांबलात, तसेच आणखी चार दिवस थांबा. आम्ही गरीब असलो तरी तुमचे पैसे भागवू. तुम्ही काळजी करू नका.' आई कळवळून त्यांना सांगत होती.

तसे कपाळावर आठ्या चढवून बापूसाहेब म्हणाले, 'अहो, वायदे कसले करता? हात-पाय चांगले धड दिसतात. अहो, कष्ट

करा. धुणी-भांडी करा.' कानात कढत तेल ओतल्यासारखे बापूसाहेबांचे शब्द सर्वांना झोंबले. अनंताला ते सहन होईना. आत्यंतिक रागाने लालबुंद होऊन तो म्हणाला,

'बापूसाहेब, फार बोललात. तुम्हाला चार दिवसांत पैसे देईन म्हणून सांगितलंय ना? मग वाटेला लागा पाहू.' अनंता संतापाने उसळला होता. मध्येच आई त्याला शांत करण्याचा प्रयत्न करीत होती. त्याचा मनावरचा ताबा सुटला होता.

'अरे वा! एवढा नाकाच्या शेंड्यावर राग होता तर कशाला पाच महिने पैसे ठेवलेत?' रागाने पाय आपटीत 'पाहतो, चार दिवसांत पैसे कसे मिळत नाहीत ते!' म्हणत बापूसाहेब निघून गेले. आई पदराने डोळे पुसत होती. सारं घर आपल्याभोवती फिरत आहे असं अनंताला क्षणभर वाटलं. भिंतीचा आधार घेऊन तो कसातरी उभा होता. तेव्हा आई अनंताकडे पाहत निश्चयाने म्हणाली, 'अंता, उद्यापासून मी कामाला जाते. आणि आता तसं कामही चालून आलं आहे. लोकांनी बोलून दाखवेपर्यंत शांत राहणं योग्य नाही.'

'आई, तू लोकांच्या घरी कामाला जाणार? छे छे! असं काही पुन्हा बोलू नकोस. माधुकरी मागेन, पडेल ते काम करेन मी– पण– पण तुला कष्ट नाही करायला लावणार! ह्या जिवात जीव आहे तोवर तुला मी लोकांच्या घरी कामाला जाऊ देणार नाही. मग माझं काहीही होवो!' जिवाच्या आकान्तानं अनंता बोलत होता.

'पण वेड्या, एवढं आभाळ फाटलं असता तू कुठं कुठं म्हणून शिवणार?'

'आई, ते काहीही असो, पण तुला मी ते काम करू देणार

नाही. मला वचन दे अगोदर. नाही ना तू कामाला दुसऱ्यांच्या घरी जाणार ?' म्हणत अनंताने तिच्यापुढे हात केला. तिचा अगदी नाइलाज झाला. उसने हसू आणीत ती 'नाही जाणार बरं कामाला कुठे !' म्हणाली तेव्हा कुठं अनंता शांत झाला.

'अन् हे काय ? तुझं अंग किती गरम लागतंय. जा, तू जाऊन झोप पाहू अगोदर.' अनंतानं तिला लगेच अंथरूण घालून दिलं. अनिच्छेनंच तिनं अंथरुणाला पाठ लावली. अनंता तिचे अंग चेपू लागला. पाय चेपीत चेपीत त्याला झोप केव्हा लागली हे देखील त्याला समजलं नाही.

पहाटे तिच्या मंजूळ भूपाळीच्या आवाजानं अनंताला जाग आली. अंगात कणकण असूनही ती आज इतक्या लवकर कशाला उठली हेच त्याला कळेना. बाबांना तिनं चहा करून दिला. झाड-लोट, सडासंमार्जन, लहान भावंडांच्या आंघोळी तिनं झटपट उरकल्या. घरापुढे अंगणात काढलेल्या तिच्या सुरेख रांगोळीकडे अनंता पाहत होता.

'बरं नव्हतं तर कशाला एवढा त्रास घेतलास आई ? मी केलं नसतं का हे सगळं ?' काळजीच्या स्वरात अनंता म्हणाला.

'शेजारून जरा ताक विरजणाला घेऊन येते,' म्हणत आई लगबगीनं आत गेली आणि भांडं घेऊन ती लगेच बाहेर पडली.

अनंतानं आंघोळ केली, देवाची पूजा केली आणि तो अभ्यासाला बसला. घरी सांगितलेला शाळेतला अभ्यास त्याने मन लावून केला. इतक्यात घड्याळात दहाचे टोल पडले. देवळातल्या घंटेचे आवाज येत होते. माधुकरीची वेळ झाली होती. अनंतानं खुंटीची झोळी घेतली अन् तो तसाच बाहेर पडला.

वैशाखाचं ऊन रणरणत होतं. पायाला चटके बसत होते. चार-

सहा घरं मागून अनंताला शाळा गाठायची होती.

'ओम भवति भिक्षांदेहीऽऽ!' एका साठ-पासष्ठ वर्षांच्या म्हाताऱ्या बाईने कमरेत वाकत हळूहळू येऊन त्याच्या झोळीत भात-पोळी व भाजी घातली. आज बरीच मिळकत झाली होती. डाव्या हातात झोळी आणि उजव्या हाताच्या मनगटानं कपाळा-वरील घाम पुशीत अनंता तसाच पळत होता. रावसाहेब पुरंदऱ्यांचं घर म्हणजे त्याचं एक हक्काचं ठिकाण होतं. माधुकरी घातल्या-खेरीज पुरंदरेकाकू अन्नाचा घास घेत नसत. आज त्यांच्या वाड्यात पाहुण्यांची गर्दी दिसत होती. आत जाऊन नेहमीप्रमाणे 'ओम भवति भिक्षांदेही–' तो जोरात म्हणाला.

'बाई, बाहेर माधुकरी घाला अगोदर– मग तुमचा बाकीचा स्वैंपाक करा. रोज बिचारं ब्राह्मणाचं एक पोर माधुकरीला येतं. घाला जा त्याला अगोदर. उगाच त्याच्या शाळेला वेळ करू नका.' पुरंदरेकाकूंचं स्वैंपाकघरातलं हे बोलणं बाहेर ऐकू येत होतं.

अनंताने झोळी पसरली अन् वर मान करून पाहिलं. 'कोण? आई– तू?'

'अनंता!' दोघांच्या डोळ्यांतून गंगा-यमुना खळाळून वाहू लागल्या. थरथरत्या हातातील भिक्षा झोळीत पडली. मातृदेवतेच्या हातचा प्रसाद होता तो! पण अशा विचित्र परिस्थितीत...

★

दहा

## संतू

---

राष्ट्रावर संकट आलं. दुपारच्या सावलीप्रमाणे गेलंही. देश पुन्हा नव्या जोमानं उभारणीच्या कामाला लागला. पण दुष्काळाने सारा देश ग्रासून टाकला. शेतकऱ्यांनी त्याविरुद्ध बंड पुकारलं. अधिक धान्योत्पादनाच्या प्रयत्नांना यश येऊ लागलं. प्रत्येकाला वाटत होतं, देशाच्या या आणीबाणीत आपणही काही तरी करायला हवं. पण ते नेमकं काय करायचं ? संतूसारख्या गरीब शेतकऱ्याला पण काही तरी करायचं होतं.

सूर्य आता पश्चिमेला कलंडू लागला होता. सोनेरी किरणांची बरसात पृथ्वीवर झाली होती. आकाशातून पाखरांचे थवेच्या थवे एका रांगेने धावत होते, आणि खाली रानामाळांतून दिवसभर काम करून दमून-भागून आलेली बाया-माणसे, कलाकला तोंड करीत जात होती. दिवभसर चरून पुष्ट झालेली जनावरे फुंफाटा

उडवत घरच्या ओढीनं धावत होती.

शेंगाकाढणीचा हंगाम लागला होता. गडीमाणसे, बाया-बापड्या, म्हारं-पोरं, गावातले चट सारे शेतात जात होते. गावात आता चिटपाखरूसुद्धा दिसत नव्हतं. पावसाअभावी पिकानं मार खाल्ला होता. सहा आणेसुद्धा पीक नव्हतं. जोंधळ्याची ताटं कडब्यासारखी वाळून कोळ झाली होती. अशा पिकाकडे बघून शेतकऱ्याचा जीव तिळतिळ तुटत होता. दुष्काळाचीच लक्षणं दिसत होती.

संतू डोक्यावर वैरणीचा भारा घेऊन चप्पल खरडत खरडत संथपणे आपल्या घराकडे चालला होता. वाळलेल्या पिकाकडे बघून ह्या दुष्काळात हातावर पोट असलेल्या आपल्यासारख्याच कसं व्हायचं, हा एकच विचार त्याच्या डोक्यात थैमान घालत होता. कारण गावात ' घर ' नाही अन् रानात ' शेत ' नाही अशी त्याची स्थिती होती. ह्या अशा राबत्यावर चार कच्च्याबच्च्यांचं पोट कसं भरायचं ? विचारांच्या तंद्रीत ओल्या वैरणीचं देखील त्याला ओझं वाटेना !

म्हाद्या, शित्या, गोदी– दोन-तीन वर्षांचं अंतर असलेली त्याची पोरं घरासमोरच्या मोकळ्या जागेत खेळत होती. बापाला बघताच खेळ टाकून ती आनंदाने नाचू लागली.

म्हाद्या तर ' आई, आई ! बाबा आला ! बाबा आला ! ' म्हणत अगदी घरात पळत गेला. शित्या, गोदीने संतूच्या पायाला मिठी घातली. त्या चिमण्या जिवांचा आनंद गगनात मावेना. संतू त्यांचे चिमणे चिमणे छोटे हात सोडवत म्हणाला, ' आरं , बाजूला

## दहा

# संतू

राष्ट्रावर संकट आलं. दुपारच्या सावलीप्रमाणे गेलंही. देश पुन्हा नव्या जोमानं उभारणीच्या कामाला लागला. पण दुष्काळाने सारा देश ग्रासून टाकला. शेतकऱ्यांनी त्याविरुद्ध बंड पुकारलं. अधिक धान्योत्पादनाच्या प्रयत्नांना यश येऊ लागलं. प्रत्येकाला वाटत होतं, देशाच्या या आणीबाणीत आपणही काही तरी करायला हवं. पण ते नेमकं काय करायचं ? संतूसारख्या गरीब शेतकऱ्याला पण काही तरी करायचं होतं.

सूर्य आता पश्चिमेला कलंडू लागला होता. सोनेरी किरणांची बरसात पृथ्वीवर झाली होती. आकाशातून पाखरांचे थवेच्या थवे एका रांगेने धावत होते, आणि खाली रानामाळांतून दिवसभर काम करून दमून-भागून आलेली बाया-माणसे, कलाकला तोंड करीत जात होती. दिवभसर चरून पुष्ट झालेली जनावरे फुंफाटा

उडवत घरच्या ओढीनं धावत होती.

शेंगाकाढणीचा हंगाम लागला होता. गडीमाणसे, बाया-बापड्या, म्हारं-पोरं, गावातले चट सारे शेतात जात होते. गावात आता चिटपाखरूसुद्धा दिसत नव्हतं. पावसाअभावी पिकानं मार खाल्ला होता. सहा आणेसुद्धा पीक नव्हतं. जोंधळ्याची ताटं कडब्यासारखी वाळून कोळ झाली होती. अशा पिकाकडे बघून शेतकऱ्याचा जीव तिळतिळ तुटत होता. दुष्काळाचीच लक्षणं दिसत होती.

संतू डोक्यावर वैरणीचा भारा घेऊन चप्पल खरडत खरडत संथपणे आपल्या घराकडे चालला होता. वाळलेल्या पिकाकडे बघून ह्या दुष्काळात हातावर पोट असलेल्या आपल्यासारख्याच कसं व्हायचं, हा एकच विचार त्याच्या डोक्यात थैमान घालत होता. कारण गावात 'घर' नाही अन् रानात 'शेत' नाही अशी त्याची स्थिती होती. ह्या अशा राबत्यावर चार कच्च्याबच्च्यांचं पोट कसं भरायचं ? विचारांच्या तंद्रीत ओल्या वैरणीचं देखील त्याला ओझं वाटेना !

म्हाद्या, शित्या, गोदी– दोन-तीन वर्षांचं अंतर असलेली त्याची पोरं घरासमोरच्या मोकळ्या जागेत खेळत होती. बापाला बघताच खेळ टाकून ती आनंदाने नाचू लागली.

म्हाद्या तर 'आई, आई ! बाबा आला ! बाबा आला !' म्हणत अगदी घरात पळत गेला. शित्या, गोदीने संतूच्या पायाला मिठी घातली. त्या चिमण्या जिवांचा आनंद गगनात मावेना. संतू त्यांचे चिमणे चिमणे छोटे हात सोडवत म्हणाला, 'आरं, बाजूला

तरी व्हा. मला डोक्यावरलं हृचे वजं तरी बाजूला ठेवू द्या !'

त्यानं वैरणीचा भारा खाली ठेवताच शित्या, गोदीनं त्याला हाताला धरून घरात ओढून नेलं. पारू— संतूची बायको— कनवटीचे पैसे मोजत होती. म्हाद्या तिच्या गळ्याला मिठी घालून पाठीवर पडला होता. शित्या आपल्या चिमुकल्या हातानं बापाचं तोंड आपल्याकडे वळवून म्हणत होता, 'बाबा, मला एक धा पैसं दे की भाज्याला.' त्याची भुणभूण सारखी चालूच होती. शेजारच्या तातोबाच्या हॉटेलातल्या कांदाभज्यांचा खमंग वास सुटला होता. दोन चवीला मिळाली तर संतूला पण हवी होती. तेव्हा तो पारूला म्हणाला, 'ए, ऐकलंस का शित्या काय म्हणतोय ते ?'

'काय म्हणतोय ?' न पाहताच ती म्हणते.

'त्येला एक धा पैसं दे की. भजी खायला मागतोय.'

'त्यो लाख मागंल. पण काय बी मिळायचं न्हाय. तासाभरात जेवाण तयार करतो. वाळलं-कोळलं कुठं पोट भरतंय व्हय ?' मोठ्या फणकाऱ्यानं पारू म्हणाली.

'अग, व्हय. पण पोरगं मागतंय. दीनास एक धा पैसं !' समजावणीच्या स्वरात संतू म्हणाला.

'ते काय जमायचं न्हाय.' झटक्यानं म्हणत आणि शेंगाचं ल्हानसं बोचकं घेऊन पारू तरातरा दुकानात गेली. त्या पैशांतून तिनं तेल, मीठ, मिरची, मसाला विकत आणला. आता किर्र तिन्हीसांज झाली होती. संतूने घरात चिमणी लावली. गुडघ्यांत तोंड खुपसून तो बसला होता. पोरं भुकेजून पेंगू लागली होती. संतू देखील अगदी थकून गेला होता. पारूने धबाधबा भाकरी

बडवल्या आणि तव्यात मिरच्यांचा खर्डा परतला.

'चला रं पोरांनू !' तिनं हाक दिली. म्हाद्या आईचा लाडका. अगोदर जेवण करून तो अभ्यास करीत होता. त्याच्या उशाला रॉकेलचा दिवा काजळी ओकत होता.

'तू न्हाय का जेवनार ?' संतू पारूला म्हणाला, 'सारी एकदमच बसू.' तव्यावरची भाकरी पचवीत पारू पटदिशी म्हणाली, 'काय नगं मला. भुका न्हाईत लई. शेंगा खाऊन खाऊन माझं प्वाट फुटायची येळ जाली हाय. तुम्ही बसून घ्या.'

'अग, व्हय. पन त्या शेंगानं काय व्हायचंय काय ? दोन घास खाऊन घे.'

'बरं, बरं. तुमी बसून घ्या, मग मी बघीन हं. बसा रं पोरांनो.'

संतूचं जेवण झालं. शित्या अन् गोदी जेवून केव्हाच बाहेर गेली. मळकट धोतराच्या सोग्यानं हात तोंड पुशीत संतू बाहेर आला. बाहेर म्हाद्याच्या छातीवर पुस्तक झोपले होते. त्याच्या उशाला ढणढण दिवा जळत होता. संतूने त्याचं पुस्तक बाजूला ठेवलं. आपल्याला एक लिहायला–वाचायला शिकवले नाही, पण म्हाद्याला तरी चांगले शिक्षण मिळावे, हीच त्याची मनातली इच्छा होती.

त्याने खूप खूप शिकावं आणि बापाचं नाव काढावं, असं संतूला वाटत होतं. त्याने मायेने म्हाद्याच्या अंगावरून एकवार हात फिरवला अन् अंगावर पांघरूण घातलं. शित्या अन् गोदी जागा सापडेल तशी एकाच पांघरुणात वाकडीतिकडी आडवी झाली होती. त्यांच्याच पायथ्याला संतूनं आपलं पटकूर पसरलं.

दिवसभराच्या कामाने त्याचं अंग विठ्ठल विठ्ठल करीत होतं. त्याला आता विश्रांतीची आवश्यकता होती.

एवढ्यात चावडीवर लोकांचा कालवा ऐकू आला. त्याबरोबर संतू लगेच अंगात कुडतं अडकवून बाहेर पडला. चावडीवर जत्रे-सारखं माणूस जमलं होतं. पायरीवर पाय दुमडून बसत संतूने शेजारच्या गणपाला विचारलं, 'आज हाय तरी काय ?'

'शानाच हायस ! दुनिव्या येकीकडं अन् तू येकीकडं. आरं, आज रेडिओवर मुख्यमंत्र्यांचं भाषन हाय. तुला ठाव न्हाय व्हय ?'

'आपण सध्या कठीण प्रसंगातून जात आहोत. प्रत्येकावर आता जास्त जबाबदारी विभागली जाणार आहे. आपणाला आता संरक्षण आघाडीच लढवायची नसून देशात अन्नधान्य आघाडी लढवावी लागेल. देशातील तरुणांनी पुढे यावे– लष्करात भरती व्हावे. याकरिता सर्वांनी आपणाला जेवढे काही करता येईल तेवढी मदत करण्याकरिता पुढे यावे. अशा वेळी आपण केलेला त्याग हा चिरस्मरणीय ठरेल. आपण केलेल्या त्यागाला यशाची फळे आल्याखेरीज राहणार नाहीत. आपण सारे हे ओळखून कराल अशी मला खात्री आहे. जय हिंद !' भाषण संपलं. माणसं पांगू लागली. संतू पण जमिनीला दोन हातांनी रेटा देऊन उठला. जड अंतःकरणानं तो घरी आला. पोरं गाढ झोपली होती.

घरात एक चिमणी मिणमिणत होती. पारू पटकूर पसरून आडवी होणार होती.

'यवढ्या रातचं गेला हुता तरी कुठं ?' अंथरूण झटकत ती

म्हणाली.

'आग, आज रेडीओवर भाषान हुतं, म्हनून दोन शब्द ऐकाया गेलो हुतो. ए, आपल्या गावातला परटाचा सख्या अन् लोहाराचा जंबा पलटणीत ऱ्हायती न्हाई का ? कसं त्याचं हुत असंल देवाला ठावं.' दोन हात हवेत हलवत संतू बोलत होता. संतूच्या पापण्या पाणावल्या, दोन बोटांनी पाण्याचे थेंब जमिनीवर झटकीत तो म्हणाला, 'त्या खेरीज ह्यो मोट्टा खटारा चालायचा नाय.' हनुवटीवर हात ठेवून तो गंभीरपणे बोलत होता.

'अवं, पन आपून त्यांना काय मदत देनार ? दिवसभर राब रात्र राबावं तवा कुठं आपली हाता-तोंडाची गाठ पडायची. अन् आपल्या गावात 'शिरमंत' लोक काय कमी हायत व्हय ? त्ये देतील की काय बी. आमा गरिबाला का तरास ?' पारू कावून बोलत होती.

'ह्ये बघ, ते काय बी असू दे. सोमवारी आपन काही रातचं जेवाण घेनार नाय. अन् त्या दिवसाचा रोजगार 'सौरक्षण निधीला' देनार हाय. एक दिवसानं आपलं काही बिघडणार नाय' हात उंचावून ताठ मानेनं संतू बोलत होता.

'पन मी म्हनतो, आपन उपाशी राहून काय उपेग होनार हाय ?' पारू.

'अगं, असं कसं म्हनतीस ? एवढा मोठा सेतू बांधताना जंगलातल्या सर्व वानरांनी मदत केली, तवा एका छोटया खारोटीनं मदत केलीय ना, अग तशी आपली मदत हाय !'

'बरं, पुरे करा तुमचं पुरान. पोरं झोपल्याती. झवापमोड

हुईल त्येंची. सकाळच्याला कामाला जायचं हाय. यरवाळी उठलं पाहिजे. ह्या राजकारनानं आपलं काय प्वाट भरनार हाय ?' पारू फटकळपणे बोलत होती. तिनं गपकन दिवा घालविला, अंधार झाला.

संतूनं अंगावर पांघरूण ओढून घेतलं. त्याचं तिच्या बोलण्याकडे लक्षच नव्हतं. त्याचं हळवं मन गलबललं.

संतूच्या डोळ्यातून गंगा-यमुना वाहत होत्या—

★ ★

दा. क्र....१०१०... दिनांक ......
विषय....किशोर. क्र. ..५.५५.
BVBK-0401080